
कृषीवल
रायगड, रविवार, दि. ८ डिसेंबर २०२४
किंमत ४ ₹

## महाराष्ट्रातील नेत्यांना सीमाबंदी

**बेळगाव :** बेळगावमध्ये महाराष्ट्र एकीकरण समितीतर्फे आयोजित करण्यात आलेल्या महामेळाव्याला महाराष्ट्रातील नेते मंडळी उपस्थित राहू नये, यासाठी बाहेरून येणाऱ्यांना बंदी घालण्यात आली आहे. तसेच नऊ डिसेंबर रोजी शिनोळी व इतर सीमानाक्यांवर चोख बंदोबस्त ठेवून अटकाव केला जाईल, अशी माहिती जिल्हाधिकारी मोहमद रोशन यांनी दिली आहे. याबाबत अधिक माहिती देण्यासाठी पत्रकार परिषदेचे आयोजन केले होते. यावेळी जिल्हाधिकारी मोहमद रोशन यांनी सांगितले की, अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी महामेळावा आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती उपलब्ध झाली आहे.

## कुंडलिका नदीत चौघे बुडाले



| माणगाव | प्रतिनिधी |

माणगाव तालुक्यातील साजे हद्दीतील कुंडलिका नदीत कपडे धुण्यासाठी गेले असता एकजण पाण्यात पडला. दरम्यान, त्याला वाचविण्यासाठी अन्य तिघांनी पाण्यात उड्या मारल्या. परंतु, दुर्दैवाने चौघेही पाण्यात बुडाले. दोघांचे मृतदेह बाहेर काढण्यात पोलिसांना यश आले असून, दोघांच्या मृतदेहाचा उशिरापर्यंत शोध लागला नव्हता.

याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, एका गाडीमध्ये

- दोन मृतदेह पोलिसांच्या ताब्यात
- दोघांचे शोधकार्य उशिरापर्यंत सुरू

एकाच कुटुंबातील १० ते १२ जण माणगाव तालुक्यातील साजे येथे कपडे धुण्यासाठी गेले होते. सदरील कुटुंब हे नवी मुंबई येथील रहिवासी असून, शिरवली येथे आजीच्या गावी आले होते. मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार

पान २ वर

### वे|ध|क

## राहुल नार्वेकर पुन्हा विधानसभा अध्यक्ष?

**मुंबई :** राज्यातील २८८ आमदारांचा शपथविधी पार पडल्यानंतर सोमवारी विधानसभेच्या नव्या अध्यक्षाची निवड होणार आहे. या पदावर पुन्हा एकदा भाजपच्या राहुल नार्वेकर यांची वर्णी लागण्याची शक्यता आहे. राहुल नार्वेकर यांची विधानसभा अध्यक्षपदावरील निवड जवळपास निश्चित मानली जात आहे. राहुल नार्वेकर हे रविवारी दुपारी १२च्या सुमारास विधानसभा अध्यक्षपदासाठी आपला अर्ज दाखल करतील. यंदा महायुतीकडे प्रचंड संख्याबळ असल्याने राहुल नार्वेकर यांची विधानसभा अध्यक्षपदावरची निवड ही केवळ औपचारिकता मानली जात आहे.

## मोबाईलच्या स्फोटात शिक्षक ठार

**भंडारा :** भंडारा जिल्ह्यात एका शिक्षकाने खिशात ठेवलेल्या मोबाईलचा स्फोट झाल्याने त्याचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. या घटनेवेळी शिक्षकाच्या शेजारी बसलेल्या वृद्धाला पण गंभीर दुखापत झाली आहे. त्याच्यावर जवळच्याच रुग्णालयात उपचार सुरू आहेत. सुरेश संग्रामे असे मयत शिक्षकाचे नाव आहे. तर, नत्थू गायकवाड असे जखमी वृद्ध व्यक्तीचे नाव आहे. मयत शिक्षक आणि जखमी वृद्ध हे दोघेही नातेवाईक आहे. या घटनेने एकच खळबळ उडाली आहे. एका कार्यक्रमासाठी जाताना खिशात हा स्फोट झाला. जखमीवर रुग्णालयात उपचार सुरू आहे.

### ईव्हीमविरोधात महाविकास आघाडी आक्रमक

# शपथविधीवर बहिष्कार

| मुंबई | प्रतिनिधी |

विधानसभा निवडणुकीमध्ये विजयी झालेल्या नवनिर्वाचित आमदारांचा शपथविधी शनिवारी (दि. ७) विधिमंडळात पार पडला. मात्र, महाविकास आघाडीच्या आमदारांनी सभात्याग करत शपथविधीवर बहिष्कार घातला. 'मॉक पोल'ची घोषणा करणाऱ्या मारकडवाडीत ग्रामस्थांवर दाखल झालेल्या गुन्ह्यांमुळे सरकारचा निषेध म्हणून आम्ही आज शपथ घेणार नाही, असे महाविकास आघाडीच्या नेत्यांनी माध्यमांना सांगून सरकारचा निषेध व्यक्त केला.




महाविकास आघाडीच्या आमदारांनी आजच्या दिवसासाठी निषेध म्हणून शपथ घेतली नाही. बहुमताचे सरकार आल्यानंतर राज्यात जे वातावरण हवे, उत्साह हवा, जल्लोष हवा तसे कुठेही दिसत नाही. कुणीही हा विजय साजरा करत नाहीय. हे बहुमत जनतेने दिलेले आहे की निवडणूक आयोग, ईव्हीएमने दिलेले आहे?

पान २ वर

> सामान्य माणूस राज्य पलटवू शकतो हे दांडी मार्चने दाखवून दिले होते.तसेच एकाधिकारशाहीला रोखण्यासाठी मारकडवाडीचा प्रयोग आधुनिक भारताचा दांडीमार्च असेल. नवीन दांडी मार्च मारकडवाडीच्या नावाने ओळखला जाईल.
> – आ. जितेंद्र आव्हाड

> लोकशाही वाचवण्याची जबाबदारी आमची आहे. मारकडवाडीतून जी ठिणगी पेटलेली आहे, ती देशात पोहोचवण्याचा संकल्प आहे. बॅलेट पेपरवर मतदान घेण्याच्या आंदोलनावर दिल्लीत तयारी सुरु आहे.
> – नाना पटोले, काँग्रेस नेते

### आज शपथ घेणार

जनतेने आम्हाला निवडून दिले आहे. त्यामुळे जनमताचा आदर राखणे महाविकास आघाडीतील लोकप्रतिनिधींचे कर्तव्य आहे. म्हणूनच आम्ही रविवारी आमदारकीची शपथ घेणार आहोत, अशी माहिती महाविकास आघाडीच्या आंदोलनात सहभागी झालेल्या सर्व नेत्यांनी दिली.

### अलिबागकरांवर जादूची मोहिनी



● जादूगार जितेंद्र रघुवीर यांनी शनिवारी अलिबागच्या भर बाजारपेठेत डोळ्यांवर पट्टी बांधून मोटारसायकल चालविण्याची कला सादर केली. यावेळी उपस्थितांकडून ठिकठिकाणी त्यांचे पुष्पहार घालून स्वागत करण्यात आले. डोळे उघडे ठेवूनही अनेकदा गाडी चालवताना आपल्याला अडखळायला होते. मात्र, जितेंद्र रघुवीर यांनी सफाईदारपणे मोटारसायकल चालवून अलिबागकरांची मने जिंकली.

## बँकेच्या दमदाटीमुळेच तरुणाची आत्महत्या

| उरण | प्रतिनिधी |

उरण तालुक्यात करंजा येथे बँकेच्या मनमानी व हुकूमशाही कारभारामुळे एका निष्पाप तरुणाने आत्महत्या करुन आपले जीवन संपविल्याची हृदय पिळवटून टाकणारी घटना घडली आहे. प्रथमेश देसाई असे या तरुणाचे नाव आहे.



पोटचा गोळा अचानक गेल्याने आईवडील व त्यांच्या कुटुंबियांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. या घटनेमुळे सर्वत्र हळहळ व्यक्त केले जात आहे. पोलिसांनी या घटनेची सखोल चौकशी करून गुन्हेगारांना आणि एमएएस (मास) फायनान्स कंपनी संचालकांना तात्काळ अटक करावी, अशी मागणी प्रथमेश देसाई याच्या आईवडिलांसह जनतेतून केली जाऊ लागली आहे.

याबाबत हकीकत अशी की, दि. ०९ नोव्हेंबर २०२२ रोजी वृषाली विलास देसाई

पान २ वर







# उड्डाणपुलाचे काम पूर्णत्वाकडे

## खारघरपर्यंतच्या रस्त्याच्या कामाला सुरूवात



**। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।**

तळोजा फेस २ ला खारघरशी जोडणाऱ्या उड्डाणपुलाचे काम जवळपास पूर्ण होत आले आहे. सध्या पुलाच्या शेवटच्या टप्प्यातील काम सुरु असून, पुलापासून खारघरपर्यंत जाणाऱ्या रस्त्याचे काम सुरु करण्यात आले आहे. तळोजा फेस १ आणि तळोजा फेस टू या परिसरात सिडकोमार्फत प्रधानमंत्री आवास योजनेतून ३० हजार घरे बांधली जात आहेत. खासगी विकसकाकडूनदेखील या परिसरात इमारती विकसित केल्या जात असल्याने परिसराचे झपाट्याने नागरिकरण होत आहे.

दोन्ही वसाहतीमधून महामार्ग गाठण्यासाठी दिवा-पनवेल रेल्वे मार्गावरील रेल्वे फाटक पार करावे लागत असल्याने फाटकामुळे होणारी कोंडी टाळण्यासाठी तळोजा फेस १ येथे अंडर पास बांधण्यात आला आहे. तसेच तळोजा फेस येथून खारघर सेक्टर २६ ला जोडणाऱ्या रस्त्याकरिता रेल्वे मार्ग आणि मुंब्रा-पनवेल महामार्गावर उड्डाणपूल बांधण्याचा निर्णय सिडकोमार्फत घेण्यात आला आहे. मात्र, काही तांत्रिक कारणाने या उड्डाणपुलाचे काम रखडले होते. पुलासाठी भूसंपादन करताना सिडकोने जमिनीच्या मालकी हक्काबाबत कायदेशीर बाबींची पडताळणी केली नाही. जमीन मालकाने मालकी हक्काचा वाद उपस्थित केल्याने उड्डाणपुलाचे काम अनेक वर्षे रखडले होते. सिडको आणि जमीन मालकांमध्ये झालेल्या वाटाघाटीनंतर उड्डाणपुलाच्या कामाला सुरुवात झाली होती. आता मात्र हे काम पूर्ण झाल्याने तळोजा फेस दोनच्या विकासाला आणखी गती मिळणार आहे. रखडलेल्या पुलाचे काम पूर्ण व्हावे यासाठी माजी नगरसेवक हरेश केणी यांनी सिडकोकडे पाठपुरावा केला होता. पुलाचे काम पूर्ण होत आल्याने केणी यांनी समाधान व्यक्त केले आहे.

### रस्त्याचे काम जे.एम.म्हात्रे इन्फ्राला

**तळोजा फेज दोन ते खारघर येथील कोस्टल मार्गाला जोडणारा हा रस्ता तळोजा आणि ओवापेठसमोरील खाडीमार्गे खारघर असा बांधण्यात येणार आहे. खाडीमार्गे रस्ता बांधण्यासाठी पर्यावरण मंत्रालय आणि वन विभागाकडून विविध परवानग्या देण्यात आल्याने रस्त्याच्या कमालादेखील सुरुवात करण्यात आली असून, हे काम जे.एम. म्हात्रे इन्फ्रा प्रा. लि. कंपनी करीत आहे.**

### मेट्रोचा पर्याय

**पेंधर ते वेळापूरपर्यंतच्या मार्गावर मेट्रो सुविधा सुरु करण्यात आली आहे. तळोजा फेस एक आणि दोन मध्ये राहण्यासाठी आलेल्या नागरिकांची यामुळे मोठी सोय झाली असून, खारघरला जोडणारा उड्डाणपूल आणि रस्त्याचे काम पूर्ण झाल्यावर वसाहतीमधील वाहन चालकांना झटपट सायन-पनवेल महामार्गावरून मुंबई, पुणे गाठता येणार आहे.**

### काहीसा उशीर

**२०१८ साली हातात घेण्यात आलेल्या पुलाचे काम २०२४ साली पूर्ण होणे अपेक्षित होते. मात्र, काम पूर्ण होण्यासाठी २०२५ साल उजाडण्याची शक्यता आहे.**



# स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच पक्का रस्ता

## कोटब्याची वाडी ग्रामस्थांकडून समाधान व्यक्त

**। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।**

सुधागडच्या ताडगाव ते कोटब्याची वाडी रस्त्याचे २५० मीटर लांब रस्त्याच्या डांबरीकरणास शुक्रवारपासून सुरुवात झाली आहे. यामुळे कोटब्याची वाडी ग्रामस्थांचा मार्ग सुकर होणार आहे. स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच या वाडीपर्यंत डांबरी रस्ता जाणार आहे.

कोटब्याची वाडी ही आदिवासी वाडी असून, ही वाडी ग्रामपंचायत ताडगाव हद्दीमध्ये येते. या वाडीत जाण्यासाठी फक्त पायवाट आहे. आदिवासी बांधवांना आजारी पडल्यावर, गरोदर महिला व शाळेतील मुले व ग्रामस्थांना दळणासाठी जवळपास एक किलोमीटरचे अंतर डोंगरामधील दगड रस्त्यातून चालत जावे लागत होते. परंतु जिल्हा परिषद माजी सदस्य रवींद्र देशमुख, शिवसेना युवक (बाळासाहेब ठाकरे) जिल्हा प्रमुख संजय म्हात्रे, आमदार रविंद्र पाटील यांच्या माध्यमातून येथील अडीचशे मीटर रस्त्यासाठी दहा लाखांचा निधी उपलब्ध झालेला आहे. आणि कामाची सुरुवात केली आहे. त्यामुळे कित्येक वर्षांपासून प्रलंबित असलेला कोटब्याची वाडीच्या रस्त्याला सुरुवात झालेली आहे. त्यामुळे आदिवासी बांधवांमध्ये आनंदाची भावना आहे.

# दिलीप पाटील यांचे निधन

**। पेण । प्रतिनिधी ।**

रंगभूमीवरचा हरहुन्नरी कलाकार ते राजकारण, समाजकारण, लोकचळवळीतला आंदोलक, सरपंच, कामगार नेता, सेझ प्रकल्प विरोधी शेतकरी संघर्ष समितीचे कार्यवाहक आणि क्रीडा, सांस्कृतिक आणि संघटक



अशा विविध गुणांनी समृध्द असलेले कणे गावचे माजी सरपंच दिलीप मुकुंद पाटील यांचे बुधवारी सायंकाळी ५ वाजता हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. गुरुवारी त्यांच्या पार्थिवावर भोगावती नदी तटावरील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन विवाहित मुली, मुलगा, आई, भाऊ यांच्यासह मोठा पाटील परिवार आहे. त्यांच्या अंत्ययात्रेला शेकापचे खजिनदार अतुल म्हात्रे, उल्का महाजन, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष वैकुंठ पाटील, पेण नगरपरिषद गटनेते अनिरुद्ध पाटील, डी.बी. पाटील, हरिओम प्रभाकर म्हात्रे, मिलिंद पाटील, डी.एम. म्हात्रे, नगरसेवक शोमेर पेणकर, संतोष पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

# उरण येथील गृह संकुलात अनधिकृत पार्किंग




**। उरण । वार्ताहर ।**

सिडकोच्या द्रोणागिरी नोड येथील गृहनिर्माण संकुलात मोठ्या प्रमाणावर अनधिकृत पार्किंग होताना दिसते. राजरोसपणे येथे शेकडो वाहने उभी केली जात आहेत. यामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होतो. या वाहनांवर कारवाई व्हावी, अशी मागणी रहिवाशांकडून जोर धरत आहे. दरम्यान, अनधिकृतरित्या पार्क केलेल्या वाहनांवर कारवाई केल्यानंतर ती वाहने ठेवण्यास उरण वाहतूक शाखेकडे मैदानच उपलब्ध नसल्याने कारवाई बारगळल्याची माहिती समोर येत आहे.

नवी मुंबई शहराला पर्याय उपलब्ध होण्यासाठी सिडकोने उरण तालुक्यातील द्रोणागिरी नोड (सेक्टर १२) येथील जेएनपीए बंदराच्या व नवघर ग्रामपंचायत हद्दीतील रेल्वे स्टेशनजवळ गृहसंकुल्प उभारले आहे. मात्र, रहिवाशांच्या गृहसंकुलातील रहिवाशांच्या रहदारीच्या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात मालाची आयात-निर्यात करणारी अवजड वाहने ही रात्री-अपरात्री अवैधरित्या पार्किंग करुन ठेवत आहेत. त्यामुळे जेएनपीए बंदर वसाहतीजवळील रस्त्यावर वारंवार वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होत आहे. तसेच गृहसंकुल्पातील रस्त्यावर वाहनांची अनधिकृत पार्किंग होते असल्याने त्याचा त्रास हा संकुलातील रहिवाशांना सहन करावा लागत आहे. तरी वाहतूक शाखेच्या पथकाने सदर अनधिकृत पार्किंगवर कारवाई करावी, अशी मागणी रहिवाशांकडून केली जात आहे.

> **आम्ही वाहन चालक हे गृहसंकुलात वास्तव्य करत असल्याने आपली वाहने घरी घेऊन येतो आणि ती रस्त्यावर पार्किंग करुन ठेवत आहोत. त्याचा त्रास रहिवाशांना होतो की नाही हे आम्हाला माहीत नाही.**
> **– हरभजन सिंग, वाहन चालक**

> **रहिवाशांच्या रहदारीच्या रस्त्यावर बेशिस्त अवजड वाहने रात्री–अपरात्री अवैधरित्या पार्किंग करुन ठेवण्यात येत असल्याने त्यांचा त्रास हा रहिवाशांना, विद्यार्थी, नोकरदारांना सहन करावा लागत आहे. तरी वाहतूक शाखेच्या पथकाने सदर अनधिकृत पार्किंगवर कारवाई करावी.**
> **– मधुकर तांडेल, रहिवासी, गृह संकुल**

# अनिल राणे, गुरुनाथ शेरमकर केंद्रप्रमुखपदी

**। पाली । वार्ताहर ।**

रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नवघर शाळेचे प्रभारी मुख्याध्यापक व पदवीधर शिक्षक अनिल कृष्णा राणे व रासळ शाळेचे पदवीधर शिक्षक गुरुनाथ शेरमकर यांची नुकतीच केंद्रप्रमुखपदी निवड झाल्याने त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.



पदवीधर शिक्षक राणे यांनी यापूर्वी पाच्छापुर शाळेचे मुख्याध्यापक म्हणून काम केले आहे. रायगड जिल्हा परिषदेकडून त्यांना आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन गौरविण्यात आले होते. शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात काम करत असताना शिक्षकांच्या समस्या सोडविण्यासाठी ते सतत प्रयत्नशील असतात. सुधागड तालुका प्राथमिक शिक्षक समन्वय समितीच्या वतीने त्यांचे अभिनंदन करुन त्यांना पुढील वाटचालीकरिता शुभेच्छा देण्यात आल्या. या पदावर ते अत्यंत उत्कृष्ट काम करुन योग्य भूमिका पार पाडतील असे मत शिक्षक मोरेश्वर कांबळे यांनी व्यक्त केले.

# चंपाषष्टी उत्सवाची काल्याच्या कीर्तनाने सांगता

**। रसायनी । वार्ताहर ।**

रसायनी पाताळगंगा परिसरातील कालिवली येथे अखंड हरिनाम सप्ताह आणि चंपाषष्टी उत्सव सहा दिवस मार्गशीर्ष षष्टी शनिवार, दि.७ डिसेंबरपर्यंत मोठ्या जल्लोषात साजरा करण्यात आला. यानिमित्ताने काळीवली येथील जय मल्हार सेवाभावी संस्थेच्यावतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. रोज भुपाळी काकडा आरती, हरिपाठ, ज्ञानेश्वरी पारायण,



खंडोबा पारायण, होमहवन, कीर्तने आदी कार्यक्रम शनिवार दि.७ डिसेंबरपर्यंत पार पडले. शनिवारी सकाळी १० ते १२ वाजता हभप प्राची मंदार व्यास यांच्या काल्याचे कीर्तनाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

कीर्तनातून खंडोरायाची चंपाषष्ठी कार्यक्रमाची महती वर्णन केली. यानंतर रात्री लक्ष्मी नारायण सोंगी भारुडाचा कार्यक्रम पार पडला. उत्सव यशस्वी करण्यासाठी खंडोबाचे भक्त राजेंद्र पाटील यांच्या जय मल्हार सेवाभावी सामाजिक संस्था व श्रीक्षेत्र खंडोबा मंदिर यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमासाठी परिसरातील भक्त मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# कळंबोलीत ओसाड खोलीत रक्ताचा सडा

**। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।**

कळंबोली वसाहतीमधील एका उद्यानात पालिकेमार्फत बांधण्यात आलेल्या एका खोलीत सर्वत्र रक्ताचा सडा पडला असल्याची घटना समोर आली आहे. याबाबत स्थानिक पोलिसांना विचारणा केली असता एखाद्या जखमी श्वानाचं हे रक्त असण्याची शक्यता व्यक्त केली आहे.

कळंबोली वसाहतीमधील सेक्टर ३ येथे सिडकोच्या माध्यमातून उद्यान विकसित करण्यात आले आहे. बाबा गार्डन म्हणून परिसरात प्रसिद्ध असलेल्या या उद्याणाचे पालिकेकडे हस्तानंतरण झाल्यानंतर पालिकेच्या मध्यमातून या ठिकाणी विविध कार्यक्रमांसाठी स्टेज तसेच काही खोल्यांचं बांधकाम करण्यात आलं आहे. बांधकाम पूर्ण झाल्यावर या खोल्या कुलूपबंद करणे अपेक्षित होते. मात्र, तसे न झाल्याने गर्दूले आणि मद्यपान करणारे या खोल्यांचा वापर करत असल्याची माहिती परिसरातील नागरिकांनी दिली आहे. त्यातच शुक्रवारी (दि.६) काही नागरिकांना अशाच एका खोलीत रक्ताचा सडा दिसून आले. खोलीत सर्वत्र पडलेल्या या सड्याबाबत स्थानिक पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक उमेश थिटे यांना माहिती मिळाली असता कळंबोली पोलीस ठाण्यातील काही कर्मचाऱ्यांनी संबंधित ठिकाणी जाऊन पाहणी केली. यावेळी चौकशी केली असता परिसरात मोठ्या प्रमाणात भटक्या श्वानांचा वावर असल्याची माहिती मिळाली.

पान १ वरून

## शपथविधीवर बहिष्कार

हा प्रश्न असल्याचे आदित्य ठाकरे म्हणाले.

शिवसेना, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेससह महाविकास आघाडीतील सर्वांनीच मध्यंतरीच्या काळात वेगवेगळ्या माध्यमाने निवडणूक आयोगाने प्रश्न उपस्थित केले. हे जनतेच्या मनातील प्रश्न आहे. मारकडवाडीतील ग्रामस्थांनी 'मॉक पोल'ची तयारी केली होती. हे सर्व निवडणुकीनंतर होत होते. तिथून जिंकलेल्या उमेदवारानेही 'मॉक पोल'ला पाठिंबा दिला होता. मॉक पोल जनतेच्या मनातील शंकांना उत्तर देणारा होता, असेही आदित्य ठाकरे म्हणाले.

बॅलेट पेपरवर कोण जिंकू शकते, ईव्हीएमवर कोण, कसे जिंकू शकते, हे आम्ही अनेकदा दाखवले आहे. आम्ही पोस्टल बॅलेट आणि ईव्हीएमच्या मतांमधील तफावतही दाखवली. पण, मारकडवाडीमध्ये फक्त कर्फ्युच नाही तर ग्रामस्थांवर गुन्हे दाखल करून काही जणांना अटकही करण्यात आली. याचा निषेध म्हणून आम्ही शपथ घेतली नाही, असेही आदित्य ठाकरे म्हणाले. ते पुढे म्हणाले की, आम्ही हरलेलो उमेदवार नाहीत. आम्ही जिंकून आलेलो आहोत. तरी देखील आमच्या मनात ईव्हीएमबद्दल, निवडणूक आयोगाबद्दल शंका आहे. जनतेचा मान राखून त्यांच्या मनात ज्या शंका आहेत त्याचा मान राखून शपथ घेत नाही आहोत.

लोकशाहीचा लॉन्ग मार्च८२१७; आम्ही हाती घेत आहोत. २०१४ पासून लोकशाही चिरडण्याचे काम सुरू आहे. लोकसभेत जनतेने निकाल दिला, पण तोच निकाल चिरडण्याचा सरकारने प्रयत्न केला. त्याविरोधात आम्ही हे पाऊल उचलले आहे, असेही आदित्य ठाकरे म्हणाले.

## कुंडलिका नदीत चौघे बुडाले

दि. ७ डिसेंबर रोजी साजे येथे कपडे धुवायला गेले असता, एक जण पाण्यात पडला. तेव्हा वाचविण्यासाठी गेलेल्या तिघांनासुद्धा पाण्याचा अंदाज न आल्याने तेसुद्धा पाण्यात वाहून गेले. या घटनेची माहिती मिळताच माणगाव पोलीस व रेस्क्यू टीम घटनास्थळी दाखल झाली. या घटनेत दोन जणांचे मृतदेह शोधण्यात पोलिसांना यश आले असून, दोघांचे मृतदेह शोधण्याची मोहीम उशिरापर्यंत सुरू होती. या दुर्दैवी घटनेमध्ये सिद्धेश सोनार (२१), काजल सोनार (२६), सिद्धी पेडेकर (१६), सोनी सोनार (२७) यांचा समावेश आहे. सिद्धेश सोनार व सिद्धी पेडेकर या दोघांचे मृतदेह सापडले आहेत. उर्वरित दोन तरुणी अद्याप बेपत्ता आहेत. घटनास्थळी पोलीस व स्थानिक नागरिक शोधपथक उपस्थित होते. दरम्यान, या घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी नदीकिनारी मोठी गर्दी केली होती. अनेकांनी पोलीस आणि रेस्क्यू टीमला शोधकार्यासाठी मदतदेखील केली. या घटनेने सोनार आणि पेडेकर कुटुंबियांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

## बँकेच्या दमदाटीमुळेच तरुणाची आत्महत्या

यांच्या नावे मोटारसायकल १५,०००/- (पंधरा हजार रूपये मात्र) डाऊन पेमेंट देऊन कर्जाने घेण्यात आली. दरमहा हप्ता ३,७८८/- होता. आतापर्यंत १६ हप्ते नियमितपणे भरले होते. गाडीची किंमत १,०८,०००/ - (अक्षरी रुपये एक लाख आठ हजार मात्र) होती. आतापर्यंत रुपये ७५,६०८/- (अक्षरी रुपये पंचाहत्तर हजार सहाशे आठ मात्र) भरले होते. अंदाजे ३२,०८६/- (अक्षरी रुपये बत्तीस हजार श्याऐंशी मात्र) बाकी होती. केवळ बत्तीस हजार रुपयांच्या वसुलीसाठी कंपनीचे एजेंट अशोक सावंत, दिलीप सिंग यांचे धमकीचे फोन सदर आमचा मुलगा प्रथमेश विलास देसाई याला यायचे. आमची मुलगा जेएनपीटी पोर्ट (एन.एस.आय. सी.टी.) येथे कामाला होता. त्याला मासिक पगार महिन्याला रुपये १३,०००/- (अक्षरी रुपये तेरा हजार मात्र) त्यातून तोच दरमहा कंपनीस कर्ज हप्ता जी.पे. (गुगल पे) करायचा नयमितपणे हप्ते भरायचा तरी मात्र एमएएस (मास) फायनान्स बँकेने अन्यायकारक पद्धतीने माझा मुलगा प्रथमेश देसाई याचा छळ केला व त्याला वेळोवेळी मानसिक त्रास दिला. त्यामुळे त्याने आत्महत्याचे शेवटचे पाऊल उचलले याला सर्वस्वीपणे एमएएस (मास)फायनान्स बँकेचे संचालक व कर्मचारी जबाबदार आहेत. त्यांना अटक करून, गुन्हा नोंदवून त्यांच्यावर कठोरात कठोर कारवाई करावी, अशी मागणी प्रथमेश देसाई याची आई वृषाली देसाई, वडील विलास देसाई यांनी केली आहे.

सदर गाडी प्रथमेशच्या आईच्या नावे असून, आई उरण मोरा रोड वरील नगराज इंटरनॅशनल स्कूल, बोरी रोड येथे शिपाई म्हणून काम करीत आहे. तर वडील विलास देसाई हे वृत्तपत्र विकायचे काम करतात.मोठे भाऊ हर्षल विलास देसाई, वय-२८ वर्षे, गणपती बनविण्याच्या करखान्यात कामगार आहेत. एका सर्वसामान्य कष्टकरी परिवाराच्या मुलास रात्री-बेरात्री सारख्या धमक्यांमुळे बेजार करण्यात आले आहे. राहत्या घराच्या बाजूजवळील विहिरीवर सर्वांसमक्ष त्या गाडीबाबत अपमानित केले. त्यावेळी गावातील महिला व नागरिक उपस्थित होते. त्याची गाडी दारातून धमकीने व जबरदस्तीने बुधवार दि. ०४ डिसेंबर २०२४ रोजी सायंकाळी ४.०० वाजता खेचून नेली. तेव्हा त्याचा मनावर आघात झाला व त्यांनी ५.३० ते ६.०० वा. दरम्यान गळफास लावून आत्महत्या केली आहे. ही दुर्दैवी घटना आहे.ज्यावेळी ही घटना घडली, तेव्हा प्रथमेशजवळ कोणीही नातेवाईक नव्हते. तो एकटाच घरी होता. मात्र फायनान्स बँकेचे मनमानी कारभार व त्रास देण्यासंदर्भातील सर्व व्हॅट्सॲप मेसेज आपल्याकडे उपलब्ध आहे. पोलिसांनी ती ताब्यात घेऊन तात्काळ गुन्हा नोंदवावी, अशी मागणी आई वडिलांनी प्रशासनाकडे केली आहे.

यासंदर्भात एमएएस फायनान्स सर्विसच्या ९०२४००६०७१, ८१४९९४५११४ या नंबर वर कर्मचाऱ्यांना फोन लावले असता ते फोन उचलण्यास टाळाटाळ करीत आहेत. दुसऱ्या कोण्या व्यक्तीने याच नंबरवर फोन केल्यास त्यांच्याकडून उडवाउडवीची उत्तरे दिली जात आहेत. प्रथमेशच्या मोठ्या भावाने या नंबरवर फोन केले असता आम्ही फायनान्सचे काम करत नाही, तुला काय करायचे कर, आम्ही कोणाला घाबरत नाहीत, अशी उडवाउडवीची उत्तरे दिली आहेत. तसेच प्रथमेशच्या मोठ्या भावाला जीवे ठार मारण्याची धमकीसुद्धा फोनवरून दिली आहे.

दरम्यान, या घटनेबाबत तक्रार दाखल करण्यात आली आहे. जर या घटनेत फायनान्स बँक किंवा फायनान्सचे कर्मचारी दोषी असतील, तर निश्चित त्यांच्यावर कायदेशीर करण्यात येईल, अशी माहिती उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र मिसाळ यांनी दिली.

# आतापर्यंत ७० टक्के दात्यांचा कर थकीत

## २६४ कोटींचा कर पालिकेकडे जमा

**। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।**

पालिका हद्दीतील जवळपास ३० टक्के मालमत्ताधारकांनी आपला मालमत्ता कर भरल्याने पालिकेच्या तिजोरीत २६४ कोटींचा कर जमा झाला आहे. मात्र, मालमत्ता कराविरोधात न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या याचिकामुळे मालमत्ता करात सूट मिळेल या आशेवर जवळपास ७० टक्के मालमत्ताधारकांनी अद्याप आपला मालमत्ता कर भरलेला नसल्याने थकीत करवसुलीच्या हालचाली पालिकेकडून सुरु करण्यात आल्या आहेत.

पनवेल पालिका हद्दीत जवळपास ३ लाख ६१ हजार २८७ करदाते आहेत. त्यातील फक्त ३० टक्के मालमत्ताधारकांनीच आपला कर भरला आहे. तर जवळपास ७० टक्के म्हणजेच २ लाख ७६ हजार ६१६ करदात्यांनी आतापर्यंत मालमत्ता कर भरलाच नाही. पनवेल महापालिका सुरुवातीचे दोन वर्षे मालमत्ता कर माफ करेल, अशी मागणी विविध राजकीय पक्षांच्या नेत्यांनी केल्यामुळे करदात्यांचासुद्धा राज्य सरकार याबाबतचा निर्णय घेईल, असा आशावाद होता. नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकी पूर्वी तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नवी मुंबई येथे पार पडलेल्या एका जाहीर कार्यक्रमात भारतीय जनता पक्षा तर्फ आमदार प्रशांत ठाकूर यांनी मालमत्ता करावरील शास्ती माफ करण्याची मागणी मान्य केल्याची घोषणा केली होती. मात्र, शास्ती माफ करण्याविषयी अधिकृत कोणताही आदेश किंवा शासन परिपत्रक पनवेल महापालिकेला न मिळाल्याने शास्ती माफीची कार्यवाही घोषणेपुरतीच राहिली असून, नव्याने सरकार स्थापनेनंतर तरी माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केलेली घोषणा प्रत्यक्षात येईल, असा आशावाद मालमत्ताकर धारकांनी व्यक्त केला आहे.

> **ज्या मालमत्ताधारकांनी कर थकवला आहे, त्यांना नोटीस देण्याची कार्यवाही सुरू करण्यात येईल. नागरिकांना कर भरणे सोयीचे व्हावे यासाठी पालिका जागोजागी शिबीर उभारणार आहे.**
> **– मंगेश चीतळे, आयुक्त, पनवेल महापालिका**

# बसस्थानकात बाकड्यांची व्यवस्था

## जैन परिवाराची सामाजिक बांधिलकी

**। हमरापूर । वार्ताहर ।**

पेण तालुक्यातील वडखळ बसस्थानकात पोयनाड येथील जैन परिवारातर्फे प्रवाशांना बसण्यासाठी बाकड्यांची व्यवस्था करण्यात आली आहे.

वडखळ बस स्थानक हे मुंबई-गोवा महामार्गावरील महत्त्वाचे असून, रायगड जिल्ह्यासह तळ कोकणात जाणाऱ्या एसटी बसेस येथे थांबतात. वडखळ परिसरात जेएसडब्ल्यू, इंडोरामा जॉन्सन या कंपन्या आल्यामुळे या भागात सतत वर्दळ असते. अनेक कामगार नोकरीच्या निमित्ताने येथून ये-जा करतात. नुकतेच वडखळ बसस्थानकाचे सिमेंट काँक्रिटीकरणदेखील करण्यात आले आहे. मात्र, या बसस्थानकात अलिबाग, पाली फलाटावर प्रवाशांना बसण्यासाठी



आसन व्यवस्था नसल्याने प्रवाशांना गाडीच्या प्रतिक्षेत उभे राहावे लागत होते. हे पाहून पोयनाडमधील स्व. शांताबाई छगमालजी जैन यांची मुले प्रकाश जैन, निर्मला जैन, संजय जैन, संतोष जैन यांनी प्रवाशांना बसण्याचे बाक देऊन बसण्याची सोय केली आहे.

पेण एसटी आगार व्यवस्थापक अपर्णा वर्तक व वाहतूक नियंत्रक अनंत सूर्यवंशी यांनी याबद्दल प्रकाश जैन व त्यांच्या कुटुंबियांचे आभार मानून, त्यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार केला.

# कब्रस्तान परिसरात साफसफाई मोहीम

**। पनवेल । वार्ताहर ।**

शिवसेनेच्या प्रयत्नाने पनवेल शहरातील कब्रस्तान परिसरामध्ये साफसफाई मोहीम राबवून परिसर स्वच्छ करण्यात आला.

शिवसेना पनवेल शहरतर्फे गुलाब हुसेन बागवान (शिवसेना उपविभाग प्रमुख) यांच्या प्रयत्नाने मंगळवारी (दि. ३) मोमीन पाडा मज्जिद च्या बाजूला असलेले कब्रस्तान हे काही दिवसांपासून अस्वच्छ म्हणजेच त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात गवत आले होते आणि साफसफाई झाली नव्हती. यावेळी गुलाब हुसेन बागवान यांनी त्वरित शिवसेना पनवेल शहर प्रसिद्धी प्रमुख तोफिक बागवान यांच्या साह्याने स्वच्छता निरीक्षक यांना फोन करून तातडीने कब्रस्तान साफसफाई करून घेतली.

**निवडक**

## शौर्य संचलनाचे आयोजन

**पनवेल :** विश्व हिंदू परिषद बजरंग दल कोकण प्रांत रायगड विभागातर्फे गीता जयंती निमित्त शौर्य संचलनाचे आयोजन करण्यात आले आहे. पनवेल शहरातील मिडल क्लास सोसायटीच्या मैदानात रविवारी (दि.८) सायंकाळी ४ वाजता पथ संचलन व त्यांनतर विश्व हिंदू परिषदेचे प्रमुख वक्ते यांची मार्गदर्शनपार सभा होणार आहे. त्याचप्रमाणे यावेळी नागरिकांना संताचे आशीर्वचनदेखील ऐकायला मिळणार आहे.

## लाथाबुक्क्यांनी मारहाण

**नवीन पनवेल :** खारघर-कोपरा येथील वीरेंद्र गिरी यांना गेमिंग झोन शॉप बंद करण्यास सांगून दोघांना लाथाबुक्यानी मारहाण आणि शिवीगाळ करण्यात आली. तसेच शॉपमधील १४ कॉम्प्युटर सिस्टीम, कॅश काऊंटर व इतर साहित्य तोडून शॉपचे नुकसान केल्याप्रकरणी ७ जणांविरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, सुरेश पाटील, नितेश कोळी, दशरथ ठाकूर, शिवा बिडवे व चरस पाटील यांनी शॉपमध्ये प्रवेश करून गिरी यांना लाथा बुक्क्यांनी मारहाण करून शिवीगाळ केली होती.

## मसाज सेंटरमध्ये वेश्या व्यवसाय

**नवीन पनवेल :** मसाज सेंटरमध्ये मसाजच्या नावाखाली वेश्याव्यवसाय करणाऱ्या महिलांविरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्ष, गुन्हे शाखा नवी मुंबई यांना हॉट स्टोन वेलनेस स्पा पहिला मजला-खारघर येथे मसाज स्पाच्या नावाने महिलांकडून जबरदस्तीने वेश्या व्यवसाय करून घेत असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार या प्रकरणी जानवी उर्फ संध्या दिनेश चव्हाण (सेक्टर १६, खारघर) यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## पथविक्रेत्यांना निवडणुकीचे वेध

**आगरदांडा :** मुरुड नगरपरिषद हद्दीमधील नोंदणीकृत पथविक्रेत्यांमधून नगरपथविक्रेता समितीमध्ये निवड करण्याकरिता निवडणूकीचे कार्यक्रम जाहीर करण्यात आले होते. ही निवडणूक ४ ऑक्टोबर रोजी नगरपरिषद कार्यालयातील सभागृहात गुप्त मतदान पद्धतीने घेतली जाणार होती. परंतु, महाराष्ट्र पथविक्रेता समिती निवडणुक २०२४ काही अपरिहार्य प्रशासकीय कारणास्तव स्थगित करण्यात आली होती. आता या निवडणुका कधी जाहीर होणार, असा प्रश्न विचारला जात आहे.

## वाघाचा बकरीवर हल्ला

**तळा :** तळा तालुक्यातील चरई बुद्रुक येथे गुरुवारी (दि.४) रात्री संतोष काप यांच्या गोठ्यात पट्टेरी वाघ शिरून त्याने गोठ्यातील बकरीवर हल्ला केला. आवाज येताच संतोष काप यांच्यासह गावकरी गोठ्याच्या दिशेने धावले. परंतु, तेवढ्यात वाघ पळून गेला. यात बकरीचा मृत्यु झाला. तळा तालुक्यात घनदाट जंगलातून बिबट्या वावरत असताना अनेक ग्रामस्थांनी पाहिले आहे. परंतु, पट्टेदार वाघ पहिल्यांदाच येथील ग्रामस्थांनी पहिला आहे.

# जिल्ह्यातील शेतकरी लागले कामाला

**। अलिबाग । प्रमोद जाधव ।**
**गेल्या अनेक दिवसांपासून जिल्ह्यातील शेतकरी भाजीपाला लागवडीच्या कामाला लागले आहेत. घराच्या बाजूला अथवा शेतांवरील मोकळ्या जागेत परसबागेच्या माध्यमातून भाजीपाला लागवड करण्यास सुरुवात करण्यात आली आहे. शेतकऱ्यांकडून मिरची, टोमॅटो, वांगी अशा अनेक प्रकारच्या भाज्यांची लागवड हजारो एकर क्षेत्रामध्ये घरच्या घरी करण्यावर भर दिला जात आहे.**




कोरोना काळात लॉकडाऊन करण्यात आले होते. त्यामुळे कोणालाही विनाकारण घरातून बाहेर पडता येत नव्हते. दैनंदिन लागणारा भाजीपालादेखील बाजारातून आणता येत नव्हता. त्यामुळे गावांतील काही महिलांनी पुढाकार घेत घरच्या घरी भाजीपाला लागवड करण्यास सुरुवात केली होती. गेल्या अनेक वर्षापासून सुरु करण्यात आलेल्या या उपक्रमाची दखल शासनाने घेतली असून परसबाग तयार करण्यासाठी पुढाकार देखील घेण्यात आला आहे. आता पावसाचा हंगाम संपला असून थंडीचा हंगाम सुरु झाला आहे. शेतासह परिसरातील मोकळ्या जागेत परसबागेच्या माध्यमातून वांगी, भेंडी, मिरची सारख्या अनेक भाजीपालांची लागवड करण्याच्या कामाला शेतकरी लागले आहेत. त्यामध्ये महिलांचा पुढाकार अधिक असल्याचे दिसून येत आहे.

### लाल कोबी लागवडीचा प्रयोग

अलिबाग तालुक्यातील उसर येथील नम्रता शिंदे या प्रगतशील महिला शेतकरी आहेत. शेतासह परिसरात वेगवेगळ्या प्रकारच्या भाज्यांची लागवड करून एक वेगळा प्रयोग करण्याचा प्रयत्न कायमच राहिला आहे. लाल कोबीची लागवड साधारणतः पुणे, नाशिक जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात केली जाते. नम्रता शिंदे या शेतकरी महिलेने लाल कोबी शेतामध्ये लावण्याचा नवीन प्रयोग केला आहे. त्याची लागवड त्यांनी शेतामध्ये केली आहे. त्यांचे पती निलेश शिंदे यांची साथ त्यांना मिळाली असून शेतामध्ये नवनवीन प्रकारच्या भाज्यांची लागवड ते करीत आहेत.

> गृहिणी म्हणून काम करीत घरच्या घरी भाजीपाला लागवड करण्याचा प्रयत्न कायमच राहिला आहे. घरातील मंडळींचीदेखील चांगलीसाथ मिळत आहे. वेगवेगळ्या प्रकारच्या भाज्यांची लागवड करून दैनंदिन स्वयंपाकासाठी भाजीचा वापर केला जात आहे. त्यामुळे घरातील मंडळींना विषमुक्त भाजी परसबागेतून मिळण्याचा आनंद आहे.
> – नम्रता शिंदे, महिला शेतकरी

कोबी, मुळा, मिरची, टोमॅटो, अल्कोल, दुधी, गवार, कार्ले, वांगी अशा प्रकारच्या भाजीपाला लागवडीला सुरुवात झाली आहे. सकाळी पाणी घालणे, गवत काढणे अशी अनेक कामे महिला शेतकरी करीत आहेत. घरकाम करीत असतानाच मोकळा वेळ भाजीपाला लागवडीवर दिला जात आहे. आज याचमाध्यमातून विषमुक्त भाजी उपलब्ध करण्याचा प्रयत्न केला जात आहे.



## पोस्ट कार्यालयावर ग्राहकांची नाराजी

**। कर्जत । प्रतिनिधी ।**
कर्जत पोस्ट कार्यालयाच्या गलथान कारभारामुळे ग्राहकांची गैरसोय होत आहे. त्यामुळे स्थानिक ग्राहकांनी या गलथान कारभाराला वैतागून वरिष्ठ कार्यालयास अर्जाद्वारे तक्रार केली आहे. मात्र, अद्यापही त्यावर कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नाही.

पोस्ट ही नागरिकांच्या दैनंदिन जीवनातील महत्त्वाची सेवा असल्यामुळे ती कार्यक्षमतेने आणि सुरळीत चालणे आवश्यक आहे. सध्या कर्जत पोस्ट कार्यालयात कर्मचाऱ्यांची संख्या अत्यंत कमी आहे. त्यातच दरवेळी तांत्रिक अडचणी, बचत गट दलालांकडून होणारा कामकाजातील गोंधळ, वीजपुरवठा खंडित झाल्यावर पर्यायी उपायांचा अभाव आणि एटीएम सेवेची सुविधा नसल्याने होणारा त्रास आदी समस्येंमुळे ग्राहक त्रस्त झाले आहेत. शिवाय ग्राहकांना तासनतास रांगेत उभे राहावे लागत आहे. यामुळे ग्राहकांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे मागील महिन्यात तक्रार केली होती, मात्र अद्यापही त्यावर कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नाही. शिवाय वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे पाठवलेल्या तक्रारींवर अद्याप कोणतेही समाधानकारक उत्तर मिळालेले नाही. संबंधित अधिकाऱ्यांनी तातडीने उपाययोजना करून या समस्यांचे निराकरण करावे, अशी अपेक्षा ग्राहकांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

## रस्ते धुळमुक्त कधी होणार? : नागरिकांचा संतप्त सवाल

**। नेरळ । प्रतिनिधी ।**
माथेरान येथील रस्ते हे लाल मातीचे तर काही रस्ते मातीपासून बनवलेल्या क्ले पेव्हर ब्लॉक यांच्यापासून बनविलेले आहेत. परंतु, मातीचे रस्ते ज्या भागात आहेत त्या भागातून प्रवास करणाऱ्या विद्यार्थींना आणि वयोवृद्ध पर्यटकांना धुळीचा त्रास होत आहे. तसेच, रस्त्यावरून उडणारी धूळ आजुबाजुंच्या झाडांवर जाऊन बसली असून झाडांच्या पानांचे रंग देखील बदलले आहेत. त्यामुळे माथेरान नगरपरिषद ते रस्ते धूळमुक्त कधी करणार, असा प्रश्न नागरिक विचारत आहेत.



माथेरान शहर लाल मातीच्या रस्त्यांसाठी प्रसिद्ध आहे. शहरातील प्रमुख रस्ते सर्वोच्य न्यायालयाच्या परवानगीने मातीपासून बनवलेल्या क्ले पेव्हर पासून बनवले गेले आहेत. शहरातील दस्तुरी ते नगरपरिषद वाचनालय, हॉटेल लाईन कडील आणि काही प्रेक्षणीय स्थळांचे रस्ते वगळता माथेरान मधील ८० टक्के रस्ते आजही लाल मातीचे आहेत. त्यातील १३ रस्त्यांवर क्ले पेव्हर ब्लॉक लावण्याची कामे करण्यासाठी राज्य सरकारने निधी दिला आहे. मात्र, माथेरान पालिका प्रशासन उदासीन असल्याने त्यातील अनेक रस्ते लाल मातीचेच राहिले आहेत.

२०२२ मध्ये आठ आठवड्यांसाठी शहरातील ११ रस्त्यांची कामे सर्वोच्य न्यायालयाने थांबविली होती. मात्र, त्यानंतर अडीच वर्षाचा कालावधी लोटला तरी माथेरान नगरपरिषद त्या रस्त्यांची गरज आणि उपयुक्ततेबाबत न्यायालयात आपले म्हणणे मांडू शकली नाही. त्याचा परिणाम शहरातील जे काही प्रमुख रस्ते क्ले पेव्हर लावण्यापासून वंचित आहेत त्यातील माथेरान नगरपरिषद वाचनालय ते छत्रपती शिवाजी महाराज रोड आणि ऑलंपिया रेसकोर्सकडे जाणाऱ्या रस्त्यावर प्रचंड प्रमाणात माती असून ती माती माणसांच्या चालण्याने देखील उडत असते.

## सोन्याने मढली प्रति जेजुरी




● अलिबाग तालुक्यातील वरसोली येथील प्रति जेजुरी समजल्या जाणाऱ्या श्री खंडोबा मंदिरात चंपाशष्टी निमित्त उत्सव साजरा करण्यात आला. यावेळी शेकडो भक्तांच्या उपस्थितीत येळकोट-येळकोट जय मल्हारच्या घोषात भंडारा उधळण्यात आला.

## महामानवाला महाविद्यालयात अभिवादन



**। अलिबाग । प्रतिनिधी ।**
प्रभाकर पाटील एज्युकेशन सोसायटी वेश्वी महाविद्यालयातील इतिहास विभागाकडून शुक्रवारी (दि.६) भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त त्यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी, पीएनपी महाविद्यालयाचे संचालक विक्रांत वार्डे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली.

दरम्यान, इतिहास विभाग प्रमुख मिलिंद घाडगे यांनी आपल्या प्रस्ताविकामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महापरिनिर्वानावर थोडक्यात भाष्य केले. तसेच, विक्रांत वार्डे यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकला आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार हे क्रांतिकारी असल्याचे विवेचन देखील केले.

या महापरीनिर्वाण दिनाला महाविद्यालयातील भूगोल विभाग प्रमुख दिनेश पाटील, विज्ञान विभाग प्रमुख पूजा म्हात्रे, इंग्रजी विभाग प्रमुख वृषाली घरत, संजना पाटील तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन साईनाथ पाटील व आभार मिलिंद घाडगे यांनी केले.

## पीएनपी महाविद्यालयात एड्स जनजागृती

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**
जागतिक एड्स नियंत्रण दिन व सप्ताहनिमित्त पीएनपी वेश्वी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाकडून बुधवारी (दि.४) विद्यार्थ्यांना एड्स जनजागृतीवर आधारित मार्गदर्शन आणि व्याख्यान देण्यात आले.

यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून अलिबाग जिल्हा सामान्य रुग्णालयातील जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण कक्षाचे जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक संजय माने हे उपस्थित होते. यावेळी राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी मिलिंद घाडगे यांनी युवकांनी एचआयव्ही विषयी संपूर्ण माहिती घेऊन या उक्तीप्रमाणे प्रतिबंधात्मक उपाय अमलात आणावे, असे सांगितले. तसेच, संजय माने यांनी एचआयव्ही होण्याची कारणे सांगून तो होऊ नये म्हणून कोणती काळजी घ्यावी, त्याची लक्षणे, समज, गैरसमज यावर विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले. महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. ओमकार पोटे यांनी विद्यार्थ्यांनी एड्स संदर्भात सतर्क रहावे आणि आपले आरोग्य निरामय कसे राहील याची काळजी घ्यावी, असे भाष्य केले.




### सर्वसामान्यांना हिवाळ्याचे वेध

# गुलाबी थंडीत व्यायामाला पसंती

**। माणगाव । प्रतिनिधी ।**
**पावसाळा संपल्यानंतर सर्वसामान्यांना वेध हिवाळ्याचे आणि गुळाबी थंडीचे लागतात. गेल्या काही दिवसांपासून हिवाळ्याची चाहूल लागली असून दाट धुके व थंडी पडत आहे. यामुळे आरोग्याविषयी जागरूक असणाऱ्या सर्वसामान्य नागरिकांनी हलक्याफुलक्या व्यायामाला सुरुवात केली असून बागेतून, रस्त्यांमध्ये तसेच सार्वजनिक ठिकाणी, उघड्या मैदानावर पहाटेच्या धुक्यात चालणे व व्यायामाला सुरुवात केली आहे.**



हिवाळा आणि आरोग्य यांचे जवळचे नाते आहे. हिवाळा ऋतू आरोग्यासाठी उत्तम समजला जातो. या दिवसात मोठ्या प्रमाणात उत्तम आरोग्यासाठी अनेकजण व्यायाम व आहाराकडे लक्ष देत असतात. हवेत असणारा किंचित गारवा, दाट धुके यामुळे आल्हाददायक वातावरण असते. पहाटे पडणाऱ्या धुक्यात चालणे, हलकासा व्यायाम करणे हे अनेकांना आवडत असते. आरोग्याविषयी जागरूक असणारे नागरिक हिवाळी दिवसांत हमखास घराबाहेर पडून हलक्या फुलक्या व्यायामाला प्राधान्य देत असतात.

गेल्या काही दिवसांपासून थंडी पडत असल्याने आरोग्य प्रेमींनी सकाळच्या वेळामध्ये चालणे, सूर्यनमस्कार, योगा, व्यायाम, सर्वांगसुंदरव्यायाम, शरीराच्या विविध हालचाली या बाबी करण्याकडे लक्ष दिले जात आहे. तरुण, वयोवृध्द, महिला तसेच विद्यार्थी व्यायामाला प्राधान्य देत आहेत.

> थंडीच्या दिवसांत व्यायाम आवश्यक आहे. थंड वातावरण व धुके यामुळे एक आल्हाददायक वातावरण असते. अशा वातावरणात मन प्रसन्न होते. तसेच, शरीर निरोगी व सुदृढ राहण्यासाठी या दिवसांत व्यायाम करत असतो. प्रत्येकाने या दिवसांत व्यायाम करणे आवश्यक आहे.
> – काशिनाथ गाणेकर, व्यायाम प्रेमी.

> थंडीच्या दिवसांत शरीराला ऊब आणि अतिरिक्त ऊर्जेची आवश्यकता असते. तसेच, शरीराचे रक्ताभिसरण चांगले होण्यासाठी व्यायामाची आवश्यकता असते. आयुर्वेदातही हिवाळ्यातील व्यायामाला महत्व दिले आहे.
> – शोभा धायगुडे, योग शिक्षिका.

# रेल्वेस्थानक परिसराला फेरीवाल्यांचा विळखा



। पनवेल । वार्ताहर ।

मुंबई आणि उपनगरीय रेल्वे स्थानकात दिसणाऱ्या फेरीवाल्यांनी आता हार्बर मार्गावरील रेल्वे स्थानकांवर देखील सद्दी निर्माण करायला सुरवात केली आहे. हार्बर रेल्वे मार्गावरील खारघर ते पनवेल रेल्वे स्थानकाबाहेरील ५० मिटर अंतरावर फेरीवाल्यांनी आपले बस्तान बसवले आहेत. फेरीवाल्यांकडून सुरु असलेल्या या अतिक्रमणांना वेळीच चाप न घातल्यास मुंबई प्रमाणे फेरीवाल्यांची समस्या हार्बर मार्गांवर देखील उग्र रूप धारण करण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

पनवेल पालिका हद्दीत मोडणाऱ्या खारघर, मानसरोवर, खांदेश्वर तसेच पनवेल रेल्वे स्थानकांचा विकास सिडको तसेच रेल्वे प्रशासनाच्या माध्यमातून करण्यात आला आहे. पालिका हद्दीत असून सुद्धा रेल्वे स्थानक परिसरात असलेल्या या रेल्वे स्थानकांत व स्थानकाबाहेर होणाऱ्या फेरीवाल्यांच्या अतिक्रमणावर कारवाई करण्याचा अधिकार रेल्वे पोलीस तसेच सिडकोच्या सुरक्षरक्षकांवर आहे. न्यायालयाने रेल्वे स्थानकाच्या बाहेर तसेच पादचारी पुलावर १५० मिटर अंतरावर व्यवसाय करण्यास निर्बंध लादले आहेत. असे असताना देखील सिडको सुरक्षा मंडळ तसेच रेल्वे पोलिसानकडून रेल्वे स्थानक परिसरात वावर असलेल्या फेरीवाल्यांविरोधात कारवाई करण्यास टाळाटाळ केली जात आहे. यामुळे अनधिकृत व्यवसाय करणाऱ्यांचे फावले असून, उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर देखील पालिका हद्दीतील रेल्वे स्थानक परिसरात बेकायदेशीर फेरीवाल्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे.

## कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)

सादर सेवा

### ई-निविदा आमंत्रण सूचना

कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लि. च्या वतीने, उप मुख्य अभियंता (कार्य), रत्नागिरी, खालील कामासाठी पात्र कंत्राटदारांकडून IREPS पोर्टलवर ई-निविदाद्वारे सिंगल पैकेट बिड प्रणालीमध्ये खुली निविदा आमंत्रित करीत आहेत.

**अनु. क्र. 1: कामाचे नाव:** एसएसई/वर्क्स/रत्नागिरी विभागांतर्गत रत्नागिरी स्टेशनवर टँकरद्वारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा. **निविदा सूचना क्र.:** केआर-आरएन-डीवाईसीईडब्ल्यू- वॉटर-2024-19 **दिनांक:** 09/12/2024. **एकूण अंदाजे मूल्य:** ₹:20,04,552.36/- (जीएसटी वगळून).

**अनु. क्र. 2: कामाचे नाव:** एसएसई/वर्क्स/माणगाव विभागांतर्गत कर्मचारी निवासस्थानांसह कोलाड, माणगाव आणि वीर स्टेशन्ससाठी टँकरद्वारे पिण्याच्या पाणीपुरवठा. **निविदा सूचना क्र.:** केआर-आरएन-डीवाईसीईडब्ल्यू-वॉटर-2024-18 **दिनांक:** 09/12/2024. **एकूण अंदाजे मूल्य:** ₹ 14,94,450/- (जीएसटी वगळून).

**निविदेसाठी वरील सर्व समान: बोली सुरू होण्याची तारीख:** 16/12/2024. **ऑनलाइन प्रस्ताव / बोली सादर करण्याची शेवटची तारीख / वेळ:** 30/12/2024 रोजी 15:00 वाजेपर्यंत. **पूर्ण होण्याची कालावधी:** पावसाळ्यासह 5 महिने. मॅन्युअल ऑफर स्वीकारल्या जाणार नाहीत. तपशील/ सहभागासाठी कृपया https://ireps.gov.in वेबसाइटला भेट द्या. शुद्धिपत्र/ परिशिष्ट फक्त या वेबसाइटवर प्रकाशित केले जाईल.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

-मुख्य संपादक

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, खालील वर्णन केलेली जमिन मिळकत. सदर जमिनीचे मालक १) श्रीमती. वंदना हरिभाऊ मुने २) श्रीमती. कविता कमलाकर झोमटे ३) श्री.संतोष हरिभाऊ मुने ४) श्रीमती दिपिका दिपक धुळे रा.साळोख तर्फे नीड, तालुका-कर्जत, जिल्हा-रायगड यांचे मालकीची व त्यांचे प्रत्यक्ष ताबे कब्जांत व वहिवाटीची ७/१२ सदरी त्यांचे नावे असलेली जमिन मिळकत भोगवटादार वर्ग २ची मिळकत मौजे-साळोख तर्फे नीड, ता.कर्जत जि.रायगड या गावी आहे. त्या मिळकतीचे वर्णन खाली लिहिले प्रमाणे

**मौजे-साळोख तर्फे नीड तालुका-कर्जत जिल्हा-रायगड येथील मिळकतीचे वर्णन**

| सर्व्हे नंबर/हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू.पै. |
|---|---|---|
| १/१/ड | एकूण क्षेत्र ०-४०-२० यापैकी खरेदी करण्याचे ठरवलेले क्षेत्र ०-२०-०० | ५-६३ |

वर वर्णन केलेली जमिन मिळकत झाडझाडोऱ्या सुद्धा सर्व हक्कहितसंबंधासह सदर जमिनीचे मालक यांचेकडून खालील सही करणार यांनी विकत घेण्यांचे ठरले असून त्याबाबत बयाणा पावती झालेली आहे. सदर जमिन मालक यांनी सदर वर वर्णन केलेली जमिन दुसरे कोणास कोणत्याही हक्काने म्हणजे साठेकरार, बयाणा पावती, हक्कसोड पत्र, बक्षीसपत्र, मृत्यूपत्र, गहाण, दान बक्षीस, खरेदी वगैरे दिलेली नाही. अगर दुसरे कोणास कोणत्याही हक्कांने दिलेली नाही. अगर तोंडी अगर लेखी करार केलेला नाही. जर करता सदर मिळकतीबाबत कोणाचीही कुठल्याही प्रकारची तक्रार हरकत असल्यांस त्यांनी सदर नोटीस प्रसिद्ध झालेल्या तारखेपासून १४ दिवसांच्या आत खालील सही करणार यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुरावे सादर करावेत. जर करीता सदर मुदतीस कोणाचीही कुठल्याही प्रकारची तक्रार हरकत न आल्यांस सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहित अशी समजून सदर मिळकतीचे रजिस्टर खरेदीखत केले जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस व हरकतीस खालील सही करणार हे जबाबदार राहणार नाही. करीता सदर जाहीर नोटीसीने कळवित आहे.

तारीख : ०७/१२/२०२४

सही/-
**श्री.नंदकुमार मोतीराम मोरे**
रा.साळोख तर्फे नीड,
तालुका-कर्जत, जिल्हा-रायगड
मो.९८२२०७८४९५/८९७५६२९१९७

## जाहीर सूचना

तमाम जनतेला याद्वारे सूचना देण्यात येते की, आम्ही याखालील लिखित अनुसूचीमध्ये अधिक स्वरूपात वर्णन केलेल्या मालमत्तेच्या (यापुढे ''मालमत्ता'' असे उल्लेखित) संदर्भामध्ये निशीत दवे (''मालक'') यांचे मालकी हक्क तपासत आहोत, जसे आमचे अशील हे मालकांकडून सदर मालमत्ता खरेदीसाठी इच्छुक आहेत.

सर्व किंवा कोणत्याही व्यक्तीला सदर मालमत्ता किंवा त्यावरील कोणत्याही भागाच्या संदर्भामध्ये/विरुद्ध कोणताही हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेप जसे की, विक्री, अदलाबदल, भाडेपट्टा, कुळवहिवाट, परवाना, विश्वस्त, धारणाधिकार, निर्वाह, सुविधाधिकार, वारसाहक्क, ताबा, जप्ती, गहाण, प्रभार, बक्षीस, प्रलंबित वाद, एफएसआय वापर किंवा अन्यकाही दावे असल्यास त्यांनी तसे सदरच्या लिखित सुचनेसह झुंजारराव आणि कं., वकील आणि सॉलिसिटर्स, ४ था मजला, जलाराम ज्योत, जन्मभुमी मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१ येथे तसे हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/ किंवा आक्षेपाच्या कागदपत्रांच्या प्रमाणित सत्य प्रतींसह या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत कळविणे आवश्यक आहे, कसूर केल्यास, तसा दावा, मागणी किंवा आक्षेप अस्तित्वात नसल्याचे मानण्यात येईल आणि जरी तसा दावा, मागणी किंवा आक्षेप कायद्यात किंवा अन्यथा अस्तित्वात असल्यास, दावेदारानी तसा दावा, मागणी किंवा आक्षेप रद्द केल्याचे मानण्यात येईल आणि/किंवा तसा दावा, मागणी किंवा आक्षेपाचा कोणताही हक्क त्याग केला असे समजण्यात येईल आणि कोणताही असा दावा, मागणी किंवा आक्षेप आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाही आणि आमचे अशील वर नमूद केल्याप्रमाणे सदर मालमत्तेसंदर्भात खरेदीव्यवहार करू शकतात.

**अनुसूची**
**(मालमत्तेचे वर्णन)**

नोंदणीकृत जिल्हा व उप-जिल्हा रायगड यांचे कार्यक्षेत्र मधील गाव-टेकाळी, तालुका - अलिबाग, जिल्हा - रायगड येथे स्थित
भूमापन क्रमांक व उपविभाग ९४, एकूण क्षेत्र ०-३१-०० (हे.आर.चौ.मी.) आकार ५ रु.५२ पै.,
ठिकाण : अलिबाग
दिनांक : ०८/१२/२०२४

झुंजारराव आणि कं. करीता
सही/-
**विक्रांत झुंजारराव**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे अशिलांनी खाली वर्णन केलेली जमिनीची मिळकत तिचे विद्यमान मालक व कब्जेदार श्री. महेश राघवन मेनन, पत्ता ऑफिस नं. ४, दुसरा मजला, गायत्री बिल्डींग, पोस्ट ऑफिस समोर, डि. के. सांधु मार्ग, चेंबुर, मुंबई - ४०००७१ यांचेकडून कायम खरेदीखताने विकत घेणेचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे रेव्हेन्यू रेकॉर्डप्रमाणे वर्णन येणेप्रमाणे

**मौजे कारगांव, ता. खालापूर, जि. रायगड येथील शेतजमिन मिळकत**

| अनुक्रमांक | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रू.पै. |
|---|---|---|---|
| १ | ६३/३अ/१ | ०.०६.०० | ०.०४ |
| २ | ६३/३अ/३ | ०.०४.०० | ०.०२ |
| ३ | ६३/३अ/४ | ०.०३.०० | ०.०३ |

येणेप्रमाणे जमिनीची मिळकत तदंगभूत सर्व हक्कहितसंबंध सुध्दा हा या जाहीर नोटीसीचा विषय आहे.

तरी सदर मिळकतीबाबत इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, खरेदीखत, ताबा, कुळवहिवाट, साठेकरार, मृत्यूपत्रांकित दान, लीज, चार्ज, बोजा, वगैरे कोणतेही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदार तर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यांसह लेखी हरकती दाखल कराव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकत ही निर्वेध, निजोखमी व बोजारहित आहे असे समजून योग्य ती कायदेशीर प्रकिया पूर्ण करुन खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर कोणतेही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी कळावे.

दिनांक : ०८/१२/२०२४
पत्ता : पाल टॉवर भिसेगाव
ता. कर्जत जि. रायगड
मो.९३०७८८५७११

सही/-
खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट
**ॲड. यज्ञेश अ.भागवत**
(बी.ई.एल.एल.बी.)

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमच्या अशिल श्रीमती तेजस्विता नरेश आसवले, रा. रूम नं.६०६, सहावा मजला, जिद्नेश टॉवर, रेती बंदर रोड, डोंबिवली, ठाणे, ४२१२०२, यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमिन मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालकांकडुन कायम खरेदी घेण्याचे ठरविलेले आहे. मिळकतीचे वर्णन : मौजे धामणी, ता.कर्जत, जि.रायगड, येथील जमिन मिळकत

| स.नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पै.) | भोगवटाधारकाचे नाव |
|---|---|---|---|
| ७८/४ | ०.२५.०० पो.ख.०.०३.०० | ०.२० | श्री. समिर अरूण शिंदे |
| | एकुण ०.२८.०० | | |

वरील वर्णनाच्या शेतजमिन मिळकतीच्या संदर्भात अन्य कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा गहाण, दान, साठेकरार, करारनामा, विकसन करारनामा, मुखत्यारपत्र, विसारपावती, खरेदीखत, कुळ, सहभागीदार, वहिवाटदार, भाडेकरार, जागा वापर परवाना, पोटगी, लीज, लीन आदी कोणत्याही प्रकारे हक्क, हितसंबंध असल्यास व त्यांची हरकत असल्यास त्यांनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन होणाऱ्या ११ (अकरा) दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार यांजकडे लेखी स्वरूपात कळवावी. येणे प्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदी विक्रीचा व कायदेशीर हस्तांतराचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्वानी नोंद घ्यावी.

कर्जत
दिनांक :- ०८/१२/२०२४

सही /-
**ॲड.उषा जे. कांबळे**
कर्जत, ''पुष्प विमल'' निवास,
नानामास्तर नगर, मुद्रे
मो.नं. ७३८५००४८०६

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. रोहिदास महादेव घाडगे व सौ.माधुरी रोहिदास घाडगे, रा. सी/२०१, श्री तिरूपती टॉवर को. ऑ.हौ. सो., अचोले रोड, एव्हरशाईन सीटी, वसई (पु.), ठाणे, ४०१२०८, यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमिन मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालकांकडुन कायम खरेदी घेण्याचे ठरविलेले आहे. मिळकतीचे वर्णन : मौजे टेंभरे, ता. कर्जत, जि. रायगड, येथील जमिन मिळकत.

| स.नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पै.) | भोगवटाधारकाचे नाव |
|---|---|---|---|
| ८/४ | ०.०२.०० पो.ख.०.००.३० एकुण ०.०२.३० | ०.०९ | श्री. अशोक गोविंद जाधव |

वरील वर्णनाच्या शेतजमिन मिळकतीच्या संदर्भात अन्य कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा गहाण, दान, साठेकरार, करारनामा, विकसन करारनामा, मुखत्यारपत्र, विसारपावती, खरेदीखत, कुळ, सहभागीदार, वहिवाटदार, भाडेकरार, जागा वापर परवाना, पोटगी, लीज, लीन आदी कोणत्याही प्रकारे हक्क, हितसंबंध असल्यास व त्यांची हरकत असल्यास त्यांनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन होणाऱ्या ११ (अकरा) दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार यांजकडे लेखी स्वरूपात कळवावी. येणे प्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदी विक्रीचा व कायदेशीर हस्तांतराचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्वानी नोंद घ्यावी.

कर्जत
दिनांक :- ०८/१२/२०२४

सही /-
**ॲड. उषा जे. कांबळे.**
कर्जत,'पुष्प विमल' निवास,
नानामास्तर नगर, मुद्रे
मो.नं.७३८५००४८०६

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेंत येते की, खाली वर्णन केलेली मिळकत त्या मिळकतीचे मालक श्रीम. यमुना मोतीराम तवळे, २.श्रीम. कुंदा रमेश पाटील, ३.श्रीम.वैजयंता नारायण मोरे, ४.उषा अशोक पाटील, ५ ललीता मोतीराम तवळे सर्व रा.मुद्रे बु. ता.कर्जत, जि.रायगड यांचेकडून आमचे अशिलाने कायम खरेदी घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खाली लिहिलेप्रमाणे,

**मौजे भालिवाडी, ता.कर्जत, जि.रायगड येथील मिळकत**

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे-आर | आकार रू=पैसे |
|---|---|---|---|
| ९३ | १ | ०-४२.० | ४=१९ |

तदंगभूत सर्व हक्क हितसंबंध यासुद्धा

तरी वरील मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा, कोणताही व कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध, ताबा-कब्जा, कुळवहिवाट, बोजा, चार्ज, पोटगी-हक्क, मृत्यूपत्रांकित दान, गहाण, बक्षीस, साठेकरार, करार मदार, फरोक्त, लिएन वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत सकृतदर्शनी पुराव्यासह लेखी हरकत खालील सही करणार यांजकडे कळविणेस विनंती आहे. वरील मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील, मागाहून येणाऱ्या तक्रारी/हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, कळावे.

तारीख : ०७/१२/२०२४

**श्री.विवेक अशोक धनवी,**
बी.कॉम, एल्एल्.बी., ॲडव्होकेट,
ऑफीस गाळा नं.७ सुमनराज को-ऑप.
हौऊ.सोसायटी, पाटीलआळी, दहिवली,
ता.कर्जत जि.रायगड
मोबाईल नंबर - ९०११७३६००२

## जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल श्री. शरद जोगेश्वर चौधरी यांनी मौजे माथेरान, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत तिचे मालक खालील प्रमाणे यांचेकडुन बक्षिसपत्राने घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे :- मौजे माथेरान, इंदिरा गांधी नगर, ता. कर्जत, जि. रायगड येथील घर मिळकत.

| घर मालकाचे नाव | घराचे क्षेत्र |
|---|---|
| कै. संतोष धोंडु पवार (मयत) वारस १) सौ. मनिषा संतोष पवार (पत्नी) २) कु. मल्हार संतोष पवार (मुलगा) ३) श्री. गिरीश धोंडु पवार (भाऊ) | MP१५९ या प्लॉट मधील घर मिळकत क्षेत्र लांबी X रुंदी २५ X२५ चौ. फुट |

वरील मिळकती ह्या आमचे अशिलांस बक्षिसपत्राने देणेचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठे करार, ताबा कब्जा, कुळवहिवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज, लिज, अटॅचमेंट, लिएन वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास हि जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल श्री. शरद जोगेश्वर चौधरी बक्षिसपत्राच्या दस्ताने पूर्ण करून घेतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही. कळावे.

दि. ०८/१२/२०२४

**ॲड. संतोष गंगाराम आखाडे**
रा. माथेरान, इंदिरानगर,
ता. कर्जत, जि. रायगड
मोबा. नं ९४२३८२२०४० / ७८७५८०२९०२

## जाहीर नोटीस

दिनांक : ०८ डिसेंबर २०२४

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिलांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमिन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडुन विकसीत करण्याकरीता घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकतीसंदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, वारसाहक्क, कुळमुखत्यारपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास किंवा त्यांची आमचे अशिलांच्या विकसन कराराच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला विकसन करारनामा लिहुन व नोंदवुन ठेवतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मौजे - नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकत :-**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | प्लॉट नं. | क्षेत्र चौरस मीटर | आकार रूपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|---|
| मे दत्तनाथकृपा डेव्हलपर्स प्रोपरायटरी संस्था तर्फे सोलप्रोपरायटर श्री. संदीप दत्तात्रय देसाई | ३५९ | ४ | ७०० | ७० | ०० |
| | ३५९ | ५ | ६६४ | ६६ | ४० |
| | ३५९ | ७ | ३०५ | ३० | ५० |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- २०३ व २०४, दुसरा मजला, साईधाम अपार्टमेंट, हुतात्मा हिराजी पाटील चौक (अंबिका नाका), पो. नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड.

सही / -
**अल्पेश अनंत कराळे**
(ॲडव्होकेट)
दिनांक :- ०८/१२/२०२४
मो. नं. ९९२२३६८१२१

## जाहीर नोटीस

सर्व लोकांना या जाहीर नोटीशीने कळविणेत येते की, मौजे मोठे-वेणगाव ता.कर्जत जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत श्री.संजय प्रभाकर कडू व सुप्रिया संजय कडू यांच्या मालकीची व प्रत्यक्ष ताबेकब्जात असून सदरची मिळकत उर्वी उमेश मिसाळ व मानस सौदान हुळगे यांनी कायम खरेदी घेणेचे ठरविले आहे.

| अ. क्र. | मालकाचे नाव | स.नं | क्षेत्र हे.आर | आकार रू.पैसे |
|---|---|---|---|---|
| १ | संजय प्रभाकर कडू सुप्रिया संजय कडू | ९०/१ | ०.२४.०० | ४.२६ |
| २ | संजय प्रभाकर कडू | ९०/१ | ०.२५.०० | ४.४३ |
| | | | एकूण क्षेत्र ०.४९.०० | ८.६९ |

वर वर्णन केलेली मिळकत निर्वेध व बोजारहित असल्याचे मिळकतीचे मालकांचे म्हणणे आहे तरी सदर मिळकतीवर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लीज म्हपत्र मिळकत विक्रीचा करार, साठेकरार, पोटगी, चार्ज, वहिवाट, ताबा, इजमेंट, बोजा, तारण, वारस, ट्रस्ट, कुळहक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्याने ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसाच्या आत खाली सही करणार यांचेकडे लेखी पुराव्यासह कळवावे तरी कोणाचीही हरकत, तक्रार दिलेल्या मुदतीत आमच्याकडे न आल्यास मिळकतीवर कोणाचाही, कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अगर तो असल्यास मिळकतीवर तो सोडून दिला आहे असे समजून खरेदीचा व्यवहार पूर्ण केला जाईल व तो मागाहून कोणतीही तक्रार आमच्यावर बंधनकारक राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

दि. ७/१२/२०२४
पत्ता-मु.पो.भिसेगाव
ता.कर्जत जि.रायगड पिन ४१०२०१
मो नं. ९४२३२३७२७८

खरेदीदार
**उर्वी उमेश मिसाळ**
**मानस सौदान हुलगे**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे कावीर, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. निखिल मंगेश चव्हाण यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| कावीर | ३११ | ०-२९-१० | ६.२५ |
| | | पो. ख. ०-०५-०० | |
| | | ०-३४-१० | |

सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्कांची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, रस्त्याच्या वहिवाटीचा निरंतर हक्क या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे, असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
तारीख : ८/१२/२०२४

सही/-
**ॲड. गणेश गोविंद पाटील**
ओ/१, २, तळमजला,
'श्रुतीसारंग' को. ऑप. हा. सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राह्मणआळी,
अलिबाग, रायगड, ४०१ २०१

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे आशिलांनी खालील वर्णनाची मिळकत, खालील मालकांकडून कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरवले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) | मालकांचे नांव |
|---|---|---|---|---|
| वरसोली, ता. अलिबाग, जि. रायगड. | १७५/१ | ०-४४-५० पो.ख. ०-०६-३० एकूण ०-५०-८० पैकी ०-०४-१७ | ७.८१ | ललिता दिपक कुंदल |

गट नं. १७५/१, एकूण क्षेत्र ०-५०-८० पैकी ललिता दिपक कुंदल यांच्या मालकीची ०-०४-१७ हे. आर. इतक्या क्षेत्राची मिळकत.

सदरहू मिळकतीवर कुणाचाही गहाण, दान, लिज, विक्रीचा करार, पोटगी, चार्ज, बक्षिस, वहिवाट, इजमेंट, बोजा, तारण, वारसा, ट्रस्ट, कुळ हक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांचे आत खाली सही करणार यांच्याकडे कागदपत्रे पुराव्यासहीत लेखी कळवावे. तशी कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार, मुदतीत आमच्याकडे न आल्यास वरील मिळकतीवर कुणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अगर अथवा तो असल्यास तो आमचे अशिलांचे लाभांत सोडून दिलेला आहे व सदर मिळकत ही निर्वेध, बोजारहित आहेत असे गृहित धरून सदरहू मिळकतीसंबंधी आमचे अशिल खरेदी विक्रीचा व्यवहार करतील. मुदतीचे बाहेर आलेल्या कुणाच्याही, कोणत्याही प्रकारच्या हरकती/ तक्रारी विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

अलिबाग.
दिनांक : ०५/१२/२०२४.

सही/-
**ॲड. सुनिल के. वाकडे**
डी-१, तळमजला,
हिराबाग को.ऑप.हौ.सोसायटी,
सगुण हॉटेल शेजारी, अलिबाग,
ता. अलिबाग, जि. रायगड.
मोबा. नं. ९८६७७१५५२४

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकार श्री. भास्कर दगडू खुडे यांनी मौजे. वाकस, ता, कर्जत, जि. रायगड येथील मिळकतीचे मालक श्री. आनंदा मारूती चेंडगे यांचेकडून सदर खालीलप्रमाणे वर्णन केलेली जमिन मिळकत विकत घेणेचे ठरविलेले आहे.

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे. आर. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| ७३ | २ | ०-२१-५० | ०-२५ |

सबब सदरबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून १५ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतेही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकती ह्या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहुन येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक ०७/१२/२०२४

**ॲड. शिवाजी किसन टोकरे**
पत्ता - शॉप नं. ९, समर्थ कृपा हौसिंग सोसायटी नेरळ,
महेश टॉकीज जवळ, नेरळ
ता. कर्जत, जि. रायगड
पिनकोड नं. ४१०१०१
फोन नं. ७३५०१९४२००

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.
२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

## क्लासिफाईड
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- प्रथम, पुर्नविवाह, व्यंग, सर्वजातीय, आंतरजातीय वेबसाईटसह स्थळांसाठी रोहा गणेश महाकाळ ८८८८९३५७७५
- डिझेल रिट्स गाडी विकणे आहे मॉडेल-२०११ एस ई किट पूर्ण नवीन ॲव्हरेज २१ ते २२ कि.मी. टायर बॅटरी नवीन विमा पॉलिसी मे २०२५ पर्यंत किंमत रू. २.०० लाख No-Agent Syteam मो.९९२१६४४१४४
- ३ BHK फ्लॅट भाड्याने देणे आहे. ३ बेडरूम, ३ बाथरूम, किचन, हॉल, रॉयल मोटार जवळ अलिबाग, ९९७५४९०१६४
- वर पाहिजे- वधू-बी.कॉम. वय ४० वर्षे विधवा एक मुलगी ७०६६१३६३६८
- उत्तम व्यवसायासाठी गुंतवणूकदार (इन्वेस्टर )पाहिजे. ७३७८४८०१५१
- अलिबाग येथील गिरीष इंटरप्रायसेस करिता साईट वर काम करण्याकरिता १८ ते ३० वर्ष वयोगटातील मुलांची आवश्यकता आहे..... शिक्षणाची अट नाही... संपर्क : ८२३७३१६२१८
- नोकरी! नोकरी !! नोकरी!!! * नवोदित पाहिजेत..* केवळ पुरुष उमेदवार, शिक्षण -१२वी, पदवीधर, द्वी पदवीधर . पगार - ₹१०,०००/- ते १२०००/- पर्यंत. (योग्यतेनुसार) कामकाज कालावधी - दिवस पाळी ८ तास. ठिकाण - अलिबाग, चेंढरे. ९८२२०९५८०३.
- अलिबाग-रिसॉर्टमध्ये कामासाठी माणसे पाहिजेत. Reception-House Keeping-Waiter-Helper-Cook-etc. Phone: 8208459424 9323152990. Email: csskshirishkar@gmail.com

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# बोर्लीपंचतनमधील रस्त्यांना वाली कोण?

## मूलभूत सुविधांचा अभाव, अंतर्गत रस्त्यांची दुरवस्था; स्थानिक प्रशासनाची अनास्था, तर अधिकाऱ्यांचा कानाडोळा

**। दिघी । वार्ताहर ।**

श्रीवर्धन तालुक्यातील बोर्लीपंचतन शहरातील अंतर्गत रस्ते कित्येक वर्षे दुर्लक्षित आहेत. सध्या रस्त्यांची अवस्था दयनीय झाली आहे. त्यामुळे उखडलेल्या रस्त्यांची पायवाट ही जीवघेणी ठरत आहे. मात्र, संबंधित प्रशासनाला काही पडली, ना लोकप्रतिनिधीना. रस्त्याची डागडुजी करण्याची जबाबदारी अखेर कुणाची, असा संतप्त सवाल बोर्लीकरांकडून करण्यात येत आहे.

बोर्लीपंचतन ग्रामपंचायतीच्या पदाधिकाऱ्यांचा आठ महिन्यांपूर्वी कार्यकाळ संपला असून सद्या येथील कारभार प्रशासक पाहत आहे. मात्र, मागील वर्षात रस्त्यांकडे अक्षम्य दुर्लक्ष झाल्याने शहराचा विकास खुंटला आहे. दिवेआगर पर्यटन स्थळामुळे बोर्लीपंचतन शहराची एक वेगळी ओळख आहे. मात्र, शहराच्या अंतर्गत रस्त्यांची स्थिती पाहता नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.



### विकासापासून कोसो दूर

**गेली कित्येक वर्ष रस्त्याचे काम न केल्याने खड्डी बाहेर पडून यावर चालणे कठीण झाले आहे. हा प्रकार अत्यवस्थ रुग्णांच्या जीवावर बेतणारा ठरू शकतो. मात्र, रस्ते दुरुस्तींची मागणी सातत्याने होत असताना या मागणीकडे अद्यापपर्यंत फारसे कोणीही लक्ष दिले नाही. त्यामुळे या शहराची विकसित शहर म्हणून ओळख पुढे येत असली तरी मुलभूत सुविधांपासून येथील नागरिक कोसो दूर आहेत.**

बोर्ली-कोंढेपंचतन मार्ग, चिंचबादेवी मंदिर मार्ग तसेच बोर्लीपंचतन-वांजळे मार्ग या मुख्य रस्त्यांकडे कित्येक वर्षे दुर्लक्ष होत असल्याने सद्यस्थितीत येथील पायी प्रवास प्रवाशांचा अंत पाहणारा ठरू लागला आहे. आता तरी हे रस्ते दुरुस्त होणार की, नाही. नाहीतर तसेच ठेवणार का, असा संतप्त सवाल स्थानिकांकडून केला जात आहे.

बोर्लीपंचतन अंतर्गत रस्त्यांची डागडुजी करण्याची जबाबदारी ही कोणाची असेल याच संभ्रम बोर्लीकरांना कायम आहे. रस्त्याच्या दुरवस्थेकडे मात्र, 'ना देणे ना घेणे' असे वागणे दिसत आहे. या रस्त्यांसोबत छोटे-मोठे साकव देखील खचले आहेत. सद्यःस्थितीत रस्ते बनले नाही तर गंभीर परिस्थिती उद्‌भवू शकते. बोर्लीपंचतन ग्रामस्थांनी ग्रामपंचायत मधून रस्ता व्हावा अशी मागणी केली आहे. मात्र, निधी अभावी रस्ते रखडल्याचे सद्या ग्रामपंचायतीवर ताबा असणाऱ्या प्रशासकाकडून सांगण्यात येत आहे.

## ट्रेकर्स सुखरुप

**पनवेल :** तळोजा कारागृहाशेजारील डोंगरावर वरळी येथून ट्रेकिंगसाठी आलेले तिघेजण रस्ता चुकल्यामुळे खोल दरीत अडकले होते. या पर्यटकांना पोलीस, अग्निशमन जवान आणि स्थानिक नागरिकांच्या मदतीने वाचविण्यात यश आले आहे. वरळी दादर येथील संजय धवल हा त्यांच्या दोन सहकाऱ्यांसह तळोजा मध्यवर्ती कारागृहाच्या मागे असलेल्या डोंगरावर ट्रेकिंगसाठी गेले होते. ट्रेकिंग करताना वाढलेले गवत आणि झाडाझुडुपांमुळे तिघेही भरकटले. बाहेर पडण्यासाठी त्यांनी कसोशीने प्रयत्न केले. मात्र, बऱ्याच प्रयत्नानंतरही कसोशीनेही यश मिळाले नसल्याने नातेवाईकांना संपर्क साधला होता. सेक्टर ३५ मध्ये वास्तव्यास असलेल्या पर्यावरणप्रेमी ज्योती नाडकर्णी यांना माहिती मिळताच झाडांची देखभाल करणाऱ्या कामगारांना त्यांनी माहिती दिली.

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

८ डिसेंबर

१) श्रीम. मीनाक्षी मोहन कोर्लेकर विद्यानगर अलिबाग, ८-१२-१९५०

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)**

**९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**



**दुर्वेश नितीन म्हात्रे, स्मरणार्थ अलिबाग**

**कै. केसरीनाथ मंगळ्या कोळी, स्मरणार्थ, अलिबाग**

## पुगाव येथे दत्त जन्मोत्सव

**कोलाड :** रोहा तालुक्यातील पुगांव गावामधील श्रीक्षेत्र दत्तमंदिर येथे सालाबादप्रमाणे मार्गशीर्ष शुद्ध गुरुवार दि.१२ ते १५ डिसेंबरपर्यंत योगीराज दत्त जन्मोत्सव व अखंड हरीनाम यज्ञ सोहळा साजरा होणार आहे. यानिमित्ताने रोज सकाळी काकड आरती, सकाळी ९.३० पंचरत्न गीता व अखंड ज्ञानेश्वरीचे पारायण होणार आहे. सध्या या कार्यक्रमाची आयोजकांकडून तयारी सुरू आहे.


## बाव नदीत अवैध वाळूउपसा

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

संगमेश्वर तालुक्यातील आंगवली बावनदी पात्रामध्ये गेल्या महिन्यापासून अवैध वाळूउपसा होत आहे. वाळूचे ढीगही नदीपात्रालगत दिसून येत आहेत. याबाबत महसूल विभागाचे दुर्लक्ष होत असल्याने ग्रामस्थ २६ जानेवारीला उपोषणाच्या पावित्र्यात आहेत.

महसूल विभागाच्या आशीर्वादमुळे राजरोसपणे वाळूउपसा होत आहे, असा ग्रामस्थांचा आरोप आहे. बुरबी घोडदे वाकी, सेवर कोंड पातळी, आंगवली मार्लेश्वर मंदिर शेजारी आणि बीएसएनएल टॉवरशेजारी नदीपात्रात वाळूउपसा केला जात आहे. वाळूउपसा राजकीय नेते व महसूल विभाग यांच्या आशीर्वादानेच होत असल्याची बोलले जात आहे. देवरुख, मारळ, बामणोली, हातीव, कासार कोळवण, निवे खुर्द, साखरपा, वांझोळे पंचक्रोशीमध्ये ट्रक व डम्पर च्या सहाय्याने दिवसा व रात्री वाळू नेली जात आहे. तलाठी, मंडल अधिकारी, तहसीलदार यांच्या दुर्लक्षामुळेच हा वाळूउपसा होत आहे, अशी चर्चा आहे. याबाबत निसर्गप्रेमी, पर्यावरणप्रेमी यांनी तीव्र नाराजी दर्शवली आहे. येत्या २६ जानेवारी रोजी देवरुख तहसील कार्यलयासमोर उपोषण करून जाब विचारला जाणार आहे. वाळू उपशामुळे आंगवली बावनदी पात्राची मोठ्या प्रमाणात धूप झाली आहे.

## उपकेंद्राजवळील आग थोडक्यात आटोक्यात



**। पनवेल, । वार्ताहर ।**

पनवेल-उरण रोडवरील विद्युत वितरण कंपनीच्या उपकेंद्राजवळील मोकळ्या जागेत लागलेली आग थोडक्यात आटोक्यात आणल्याने पनवेल अंधारात जाता जाता वाचले.

पनवेलमध्ये उरण नाका येथे महावितरणचे उपकेंद्र आहे. त्याठिकाणी मोठ्या प्रमाणात जंगली झाडे वाढली आहेत. त्या उपकेंद्राच्या आवारात आजूबाजूचे नागरिक कचरादेखील टाकतात. उपकेंद्र असल्यामुळे भूमीगत विद्युत तारादेखील तेथून गेल्या आहेत. त्याठिकाणी अशाच मोकळ्या जागी कचरा टाकण्यात आला होता. अचानक या कचऱ्याजवळ आग लागली. ती आग वाढू लागली. या आगीने रौद्र रूप धारण करण्यापूर्वीच जागरूक नागरिकांनी महापालिकेच्या अग्निशमन दलाला संपर्क साधला. अग्निशमन दलाचे जवान काही क्षणातच सदर ठिकाणी पोहोचले आणि आग आटोक्यात आणली. ही आग आटोक्यात आणली नसती तर भूमीगत विद्युत तारांना आग लागली असती. त्यामुळे पूर्ण पनवेल शहर अंधारात जाण्याची शक्यता होती.

## वानस्ते ग्रामपंचायतीत जागतिक दिव्यांग दिन साजरा

**। तळा । वार्ताहर ।**

जागतिक दिव्यांग दिन वानस्ते ग्रामपंचायतीत सकाळी ११.३० वाजता साजरा करण्यात आलात्र यावेळी बारा दिव्यांग बांधवांना गुलाब पुष्प देऊन व दिव्यांग कल्याण निधीतून खुर्ची वाटप केले. यावेळी दिव्यांग दिनाचे महत्त्व विशद केले.


दिव्यांगाचे मनोबल वाढावे, मनातील न्यूनगंड काढून आपण सुदृढ असल्याची जाणीव करून भावना निर्माण व्हावी, दिव्यांग (अपंग) नसून तो सुदृढ आहे, इतरांनी त्यांच्याकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलला पाहिजे. याच उद्देशाने जागतिक दिव्यांग दिन साजरा करीत आहोत, असे ग्रामसेविका मनीषा कुंभार यांनी सांगितले. यावेळी प्रशासक डी.डी. झोरे यांच्या अधिपत्याखाली नियोजन करण्यात आले होते. यावेळी दिव्यांग बांधव, सदस्य, लेखनिक, शिपाई उपस्थित होते.



# साप्ताहिक राशिभविष्य ०८ ते १४ डिसेंबर २०२४


**ज्योतिषी : मिलिंद पाटील, सारळ-अलिबाग**
**मोबा.९४०४७९१७९८**

### जोडीदाराची साथ मिळेल



**मेष :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात विविध प्रकारच्या आव्हानांना सामोरे जावे लागणार आहे व त्यातून मार्ग काढा. आठवड्याच्या पूर्वार्धात अनेक अडचणींना तोंड द्यावे लागणार आहे. पण, त्यानंतर मात्र कामे मनासारखी होऊ लागतील. कौटुंबिक वातावरण चांगले ठेवण्याचा प्रयत्न करा. घरातील व्यक्तींकडे जास्त लक्ष द्या. बोलण्यावर योग्य नियंत्रण ठेवा. आर्थिक बाजू ठीक राहील. नोकरदारांना दिलासा मिळेल. अनावश्यक खर्च टाळा. प्रकृतीस्वास्थ्य जपा. जोडीदाराची उत्तम साथ मिळेल. आपल्या कामाला चालना मिळेल. आपल्या खर्चावर योग्य नियंत्रण ठेवणे हितकारक ठरेल. प्रवासात सावध राहा. स्थावर-जंगम बाबतीतील प्रश्नांना चालना मिळेल. बौद्धिक क्षेत्राला वाव मिळेल व उद्योगधंद्याला चालना मिळेल. आप्तेष्ट मंडळींच्या संपर्कात राहाल. सामाजिक कार्यात अग्रेसर राहाल. **महिलांना :** धार्मिक कार्यात सहभागी होण्याची संधी प्राप्त होईल. खाण्यापिण्याची पथ्ये पाळा. प्रत्येक बाबतीत जुळवून घेण्याचा प्रयत्न करा. विविध प्रकारच्या, विशेषतः कार्यालयीन व कौटुंबिक प्रश्नांना सामोरे जावे लागणार आहे. उद्योग-व्यवसायात प्रगती करण्याची संधी प्राप्त होईल. **शुभ दिनांक :** ९,१०

### वरिष्ठांची मर्जी सांभाळा



**वृषभ :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात विद्यार्थ्यांनी शिक्षणाच्या माध्यमातून व्यक्तिविकासाचे ध्येय बाळगावे. सरकारी नियमांचे पालन करा. काही जुने येणे वसूल होण्याची शक्यता आहे. विरोधकांना संधी देऊ नका. कलाक्षेत्राला प्रोत्साहन मिळेल. काही भाग्यवंतांना दोनाचे चार हात होण्याची शक्यता राहील. जोडीदाराची उत्तम साथ मिळेल. आपणास कार्यालयातील व कौटुंबिक गोष्टींबाबतचे महत्त्वाचे निर्णय घ्यावे लागणार आहे. कलाक्षेत्राला चांगले प्रोत्साहन मिळेल. महिलांना त्यांच्या कलागुणांना उत्तम प्रतिसाद मिळेल. हितशत्रूंच्या कारवायांवर कडक नजर ठेवा, त्यांना संधी मिळणार नाही. याची दक्षता घ्या. जमीन-जुमल्याच्या कामांना गती मिळेल. कोर्टकचेरीच्या कामांना चालना मिळेल. कौटुंबिक गोष्टींना प्राधान्य द्या. नोकरदारांना दिलासा मिळेल. वरिष्ठांची मर्जी सांभाळता येईल. राजकीय व्यक्तींना हा काळ चांगला आहे. सरकारी नियमांचे कटाक्षाने पालन करा. **महिलांना :** सर्व कामांचे नियोजन केल्यास आपण सर्व बाबतीत यशस्वी होण्याची शक्यता राहील. बोलण्यावर योग्य नियंत्रण ठेवावे. प्रलोभनांपासून दूर राहा. अचानक प्रवासाचे योग संभवतातमुलांकडून सुवार्ता समजू शकतात. गाठीभेटीचे योग संभवतात. **शुभ दिनांक :** ०८,०९

### प्रवासात सावधानता बाळला




**मिथुन :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात बऱ्यापैकी अनुकूलता लाभल्याने पुष्कळशा बाबतीत आपण सफलता मिळवू शकाल व आनंद घ्याल. कौटुंबिक गोष्टींना प्राधान्य द्या. उद्योग-व्यवसायात प्रगती करता येईल. प्रकृतीस्वास्थ्य जपा, विशेषतः खाण्याची पथ्ये व उष्णतेच्या विकारांपासून सावध राहा. प्रवासात सावधानता बाळगा. जागेसंबंधीचे प्रश्न सोडविता येतील. घरगुती वातावरण चांगले ठेवा. वैवाहिक जोडीदाराची साथ मिळेल. पाहता आपण सर्व बाबतीत जिद्द व आत्मविश्वासाने वागल्यास अपेक्षित गोष्टी साध्य करता येतील. नोकरदारांनी वरिष्ठांशी मिळते-जुळते घेण्याचे धोरण स्वीकारावे. स्थावरसंबंधीच्या प्रश्नांची उकल करता येईल. राजकीय क्षेत्रातील मंडळींना हा काळ छान राहील. थोरामोठ्यांच्या गाठीभेटीचे योग संभवतात. आर्थिक बाबतीत सावधानता बाळगावी. अपेक्षित गोष्टी साध्य करता येतील. आर्थिक बाजू ठीक राहील. **महिलांना :** सामाजिक क्षेत्रात आपली वाहवा संभवते. वादाचे प्रसंग कटाक्षाने टाळा. आपल्या परिश्रमाचे चीज झाल्याचे समाधान मिळेल. सर्वसाधारण स्वरूपाचा राहण्याची शक्यता राहील. नोकरदारांना मोठा दिलासा मिळेल. हितशत्रूंना संधी देऊ नका. **शुभ दिनांक -** १०,११

### अनावश्यक खर्च टाळा




**कर्क :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात व्यवसाय क्षेत्रात प्रगती साधता येईल. अनावश्यक खर्च मात्र टाळा. महत्त्वाच्या योजना अथवा गोष्टी यांची गुप्तता बाळगावी. भावी काळासाठी गुंतवणूक करण्याचा प्रयत्न करा. वादाचे प्रसंग कटाक्षाने टाळावे. कलाक्षेत्राला प्रोत्साहन मिळेल आपण घेत असलेल्या परिश्रमांना चांगला प्रतिसाद मिळून चीज झाल्याचे समाधान मिळेल. संगणक, तांत्रिक क्षेत्र व्यवसायातील व्यक्तींना चांगला काळ राहील. कौटुंबिक गोष्टींना प्राधान्य द्या. आपल्या कामाची, प्रगतीची नोंद ठेवणे हितकारक राहील. अडचणींतून मार्ग काढण्याचे तंत्र स्वीकारा व ध्येयाचा पाठपुरावा करा. धार्मिक कार्यात सहभागी व्हाल. आर्थिक बाजू ठीक राहील. प्रलोभनांपासून दूर राहा. कामाचा ताण आपल्या प्रकृतीवर होणार नाही याची दक्षता घ्या. आपण आपल्या कामाला योग्य प्रकारे न्याय देण्याचे धोरण स्वीकारल्यास हा आठवडा सर्व दृष्टीने चांगला जाईल. सत्याचा मार्ग स्वीकारून आपल्या सर्व जबाबदाऱ्या पार पाडण्याचा प्रयत्न करा. कलाक्षेत्राला उत्तम प्रोत्साहन मिळेल. सामाजिक क्षेत्रात आपली वाहवा होईल. **महिलांना :** कोणताही निर्णय विचारपूर्वक घ्या, चुकीचा निर्णय घेण्याचे टाळा. प्रवासाचे योग संभवतात. धार्मिक कार्यात सहभागी व्हाल. आपल्या मनाप्रमाणे पुष्कळशा गोष्टी साध्य होतील. **शुभ दिनांक :** १२,१४

### आर्थिक बाजू उत्तम राहील



**सिंह :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात नोकरदारांनी वरिष्ठांशी जुळवून घेण्याचे धोरण स्वीकारावे. उद्योग-व्यवसायात नवे काही करण्यापेक्षा आहे तेच सांभाळणे महत्त्वाचे राहील. आर्थिक बाजू ठीक असली तरी अनावश्यक खर्च टाळावा. मित्रमंडळी व आप्तेष्टांशी सामंजस्याने वागावे. प्रलोभनांपासून दूर राहावे. सरकारी नियम व कायदा यांचे पालन करावे. प्रकृतीकडे अधिक लक्ष द्यावे. हाती घेतलेली कामे पार पाडता येतील. कौटुंबिक गोष्टींना प्राधान्य द्या विशेषतः पूर्वार्धात विविध प्रकारचे प्रश्न आपल्यापुढे उभे ठाकतील, पण त्यांची आत्मविश्वासाने उकल केल्यास उत्तम राहील. कलाक्षेत्राला प्रोत्साहन मिळेल. महिलांना त्यांच्या कलागुणांना वाव मिळेल. प्रवासाचे योग संभवतात. आर्थिक बाजू ठीक राहील. कौटुंबिक गोष्टींना प्राधान्य द्या. बोलण्यावर योग्य नियंत्रण ठेवा. **महिलांना :** कौटुंबिक जीवन बऱ्याच अंशी चांगले राहील आणि तुम्हाला मान सन्मानाची प्राप्ती होईल. भाऊ-बहिणीची काळजी घेणे उत्तम राहील. शिक्षणाच्या क्षेत्रात तुम्हाला कठीण परिश्रम करावे लागेल, तेव्हाच तुम्हाला चांगले परिणाम मिळतील. **शुभ दिनांक :** १०,१३

### मनाजोगी कामे होतील



**कन्या :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात आर्थिक दृष्टीकोनाने हा आठवडा थोडा कमजोर राहू शकतो. म्हणून पैशाचा हिशोब चांगल्या पद्धतीने ठेवा, म्हणजे तुम्हाला कुठल्याही प्रकारच्या आर्थिक समस्यांचा सामना करावा लागणार नाही. बेरोजगार लोकांना एक स्थायी नोकरी मिळण्याची शक्यता आहे. आपण योजलेली कामे मनाप्रमाणे पार पाडता येतील. मात्र, आपल्या रागावर योग्य नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. सरकारी कामकाजात सफलता मिळू शकेल. आपल्या जबाबदाऱ्या पार पाडण्याचा प्रयत्न करा. आर्थिक बाजू सावरता येईल. नोकरदारांना मोठा दिलासा मिळेल. व्यापारात मात्र सावधानता बाळगावी. आपली मानसिकता स्थिर ठेवल्यास उत्तम. घरगुती वातावरण चांगले राहील. महत्त्वाच्या कागदपत्रांवर वाचूनच स्वाक्षऱ्या करा. अध्ययनातील अडथळे दूर करता येतील. **महिलांना :** आपण घेत असलेल्या परिश्रमांचे योग्य चीज झाल्याचे समाधान मिळू शकेल. आर्थिक बाबतीत मात्र खर्चावर योग्य नियंत्रण ठेवणे हितकारक ठरू शकते. आपले ध्येय साध्य करण्यासाठी चातुर्य व बळाचा वापर करून यशाची वाटचाल करू शकाल. **शुभ दिनांक** -१२,१४

### जुनी येणी वसूल होतील




**तुळ :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात बौद्धिक क्षेत्राला वाव मिळेल. स्थावर-जंगमविषयक कामांना गती मिळेल. प्रवासात सावधानता बाळगा. धार्मिक कार्यात सहभागी व्हाल. प्रकृतीमान ठीक राहील, पण खाण्यापिण्याची पथ्ये पाळा. आपणास बऱ्यापैकी अनुकूलता मिळू शकते व आपले ध्येय साध्य करू शकाल. महत्त्वाच्या कामात आपणास सफलता मिळू शकेल. आर्थिक बाजू सावरता येईल. काही जुने येणे वसूल होण्याची शक्यता आहे. विवाहेच्छुकांच्या अपेक्षा पुऱ्या होण्याची शक्यता राहील. आपल्या भावनांवर योग्य नियंत्रण ठेवा. विरोधकांची धास्ती बाळगू नका. सामाजिक क्षेत्रात अग्रेसर राहाल. सरकारी नियमांचे पालन करा. कलागुणांना उत्तम प्रोत्साहन मिळेल. प्रवासाचे योग संभवतात. कामाचा उत्साह वृद्धिंगत होईल. आपली बलस्थाने कोणती आहेत याचा आढावा घ्या व भविष्याच्या योजना आखा. कला, क्रीडा क्षेत्रातील व्यक्तींना मानसन्मानाचे योग संभवतात **महिलांना :** स्थावर-जंगमबाबतचे प्रश्न सोडविता येतील. आर्थिक बाजू ठीक राहील. लहान-सहान गोष्टींवरून वादविवादाचे प्रसंग उद्भवणार नाही याची दक्षता घेतल्यास हा आठवडा चांगला जाईल. **शुभ दिनांक -** ०८,११

### बोलण्यावर नियंत्रण ठेवा



**वृश्चिक :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात वादाचे प्रसंग सामंजस्याने व शांततेने सोडविण्याचा प्रयत्न करा. मुलांकडे अधिक लक्ष द्या. नको त्या प्रलोभनात अडकू नका. जोडीदाराशी सहकार्याने वागा. नातेसंबंध जपा. अनावश्यक खर्च टाळा. आपण आपल्या बोलण्यावर योग्य नियंत्रण ठेवल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य करू शकाल. बेकारांना नोकरीची संधी प्राप्त होईल. बोलण्यावर मात्र नियंत्रण ठेवा म्हणजे गैरसमज होणार नाही. येणाऱ्या लहान-सहान अडचणींतून मार्ग काढा व ध्येयाकडे जाण्याचा मार्ग स्वीकारा. विशेषतः उष्णतेच्या विकारांपासून सावध राहा. शेतीविषयक कामांना गती मिळेल. वैवाहिक जोडीदाराची साथ मिळेल. हा आठवडा कौटुंबिक व कार्याच्या कर्तव्यांचा पाठपुरावा करणारा असणार आहे. आतापर्यंत केलेल्या कार्याचा आढावा घेऊन आपण कुठे कमी पडलो याचा विचार करून वागणे सर्व दृष्टीने योग्य राहणार आहे. जागेसंबंधी वादाचे प्रसंग उद्भवणार नाही याची दक्षता घ्या. नोकरदारांनी वरिष्ठांशी जुळवून घेण्याचा प्रयत्न करावा. **महिलांना :** आर्थिक बाबतीत सावधानता बाळगावी. जोडीदाराशी सामंजस्याने वागणे हितकारक राहील. आपण बऱ्याच गोष्टी साध्य करू शकाल व आपली घोडदौड चालू राहील. **शुभ दिनांक -** ०९,११

### कर्तृत्वाला वाव मिळेल



**धनु :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात वरिष्ठांची मर्जी सांभाळता येईल. आपल्या कर्तृत्वाला चांगला वाव मिळेल. जीवनात योग्य व्यवस्थापनांची जरूरी असते, त्याप्रमाणे वागण्याचा प्रयत्न करा. कलाक्षेत्राला प्रोत्साहन मिळेल. महिलांना त्यांच्या कलागुणांना चांगला वाव मिळेल. हितशत्रूंची काळजी करू नका. खाण्यापिण्याची पथ्ये पाळा. गुंतवणूक करताना तज्ज्ञांचा सल्ला घ्या. अनावश्यक खर्च टाळा. कुटुंबाकडे अधिक लक्ष द्या. आपल्या कामकाजाचा व्याप वाढल्याने व कौटुंबिक गोष्टींकडेही लक्ष द्यावे लागणार असल्याने आपण व्यस्त राहाल. क्रीडा व तांत्रिक क्षेत्रातील व्यक्तींना हा काळ उत्तम राहील. प्रलोभनांपासून दूर राहा. व्यापार-उद्योगाला चालना मिळेल. आपल्याकडील अतिरिक्त पैसा नीट सांभाळून ठेवा. सरकारी नियमांचे पालन करा. अनावश्यक खर्चावर नियंत्रण ठेवा. जोडीदाराशी जुळवून घ्या. **महिलांना :** आपण परिस्थितीनुसार विचार बदलल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य करता येतील. कौटुंबिक गोष्टींना प्राधान्य देऊन त्यांच्या अपेक्षांची पूर्तता करा. गैरसमज होणार नाही याची दक्षता घ्या. कोणत्याही कारणांनी भावनेच्या आहारी जाऊ नका. **शुभ दिनांक -** १०,१२

### व्यवसायात प्रगतीला वाव



**मकर :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात विरोधकांना संधी मिळणार नाही याची दक्षता घ्या. प्रवासाचे योग संभवतात. धार्मिक कार्यात सहभागी व्हाल. घरगुती वादाचे प्रसंग कटाक्षाने टाळा. आपण सर्व बाबतीत सामंजस्याने वागल्यास बऱ्याच अपेक्षा पूर्ण होतील व समाधान मिळेल. नोकरदारांनी वरिष्ठांशी जुळवून घेण्याचे धोरण स्वीकारावे. प्रलोभने टाळा. आर्थिक व्यवहारात सावधानता बाळगा. आप्तेष्ट व मित्रमंडळींशी सामंजस्याने वागणे हितकारक ठरेल. सरकारी नियमांचे पालन करा. विरोधकांना संधी देऊ नका. प्रकृतीबाबत अधिक दक्ष राहा, आर्थिक बाजू ठीक राहील. आपण सर्व बाबतीत नियोजनाची साथ घेतल्यास अपेक्षित गोष्टी साध्य करता येतील. उद्योग-व्यवसायात प्रगती करता येईल. कलाक्षेत्राला चांगले प्रोत्साहन मिळेल. काही मंडळींना प्रसिद्धीचे वलय प्राप्त होण्याची शक्यता आहे. कौटुंबिक गोष्टींना प्राधान्य देऊन त्यांच्या अपेक्षांची पूर्तता करा. **महिलांना :** बोलण्यावर मात्र योग्य नियंत्रण ठेवा. कोणाशीही नाराजी पत्करू नका. प्रकृतीस्वास्थ्य जपा. आर्थिक बाजू ठीक राहील. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून कामांचा विस्तार करता येईल. **शुभ दिनांक -** ११,१४

### कामात घाईगडबड टाळा



**कुंभ :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात कामाचे नियोजन केल्यास कामाचा भार कमी होऊ शकेल. खरेदीचे बेत साध्य होतील. शाब्दिक चकमकी मात्र कटाक्षाने टाळा. आर्थिक गुंतवणूक मात्र तज्ज्ञांच्या सल्ल्याशिवाय करू नका. प्रकृतीस्वास्थ्याबाबत अधिक सावध राहा, विशेषतः उष्णतेचे विकार व अपचन विकार. आपला दृष्टिकोन नेहमी सकारात्मक ठेवा. जोडीदाराची अपेक्षित साथ मिळू शकेल. कोणालाही शब्द अथवा आश्वासने देण्याचे टाळल्यास हा आठवडा बऱ्यापैकी चांगला जाईल. नोकरदारांनी वरिष्ठांशी जुळवून घेण्याचा प्रयत्न करावा. कामकाजात घाईगडबड टाळा. विचारपूर्वक निर्णय घ्या. महिलांना अंगभूत कलागुणांना चांगले प्रोत्साहन मिळेल. आपला प्रभाव इतरांवर पाडू शकाल. प्रकृतीमान ठीक असले तरी मोसमी आजारांपासून सावध राहा. **महिलांना :** जोडीदाराची अपेक्षित साथ मिळेल. आपणास दैनंदिन कामकाजात येणारे प्रश्न वादविवाद न करता चर्चेने सोडविणे अधिक हितकारक ठरेल. नको त्या प्रलोभनात अडकू नका. आपल्या प्रकृतीस्वास्थ्याबाबत अधिक दक्ष राहा, विशेषतः खाण्यापिण्याची पथ्ये, उष्णतेचे विकार याबाबत सावध राहा. **शुभ दिनांक -** ०८,१३

### जितकी मेहनत, तितका लाभ



**मीन :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात तुम्ही कुटुंबातील बऱ्याच जबाबदाऱ्यांना पूर्ण कराल ज्यामुळे तुमच्या प्रतिष्ठेत वृद्धी होईल. तसेच तुमचा समाजातही मान-सन्मानही वाढेल आणि तुम्ही एक प्रसिद्ध व्यक्ती म्हटले जाल. शिक्षणाच्या क्षेत्रात मिश्रित परिणामांची प्राप्ती होईल. तुम्ही जितकी मेहनत कराल, तितकाच तुम्हाला आर्थिक लाभ होईल. करिअरमध्ये विदेशी स्त्रोतांनी चांगला लाभ मिळेल आणि तुमच्या कामासाठी तुमचे कौतुक होईल. तुम्हाला आपल्या मनासारख्या स्थानावर स्थानांतरण मिळू शकते. या आठवड्यातआपल्याला चांगल्या गोष्टी होण्याचे संकेत देत आहे. जुने काही आजार असतील तर त्यातून तुम्हाला मुक्ती मिळेल. तुम्हाला जीवनाने जोडलेल्या बऱ्याच मोर्चांवर बरीच मेहनत करावी लागेल. प्रेमजीवनासाठी कालावधी अनुकूल राहील आणि तुमच्यातील काही लोकांना विवाहाची वार्ता ऐकण्याची संधी मिळेल आणि तुम्ही तुमच्या प्रियतमाला आपले बनवण्यास यशस्वी राहाल. **महिलांना :** विवाहित लोकांच्या दांपत्य जीवनात चढ-उताराची स्थिती राहू शकते. तुम्हाला काळजी घ्यावी लागेल की तुम्ही तुमच्या कामाव्यतिरिक्त जीवनसाथीला पर्याप्त वेळ द्या. **शुभ दिनांक -** ०९,११

# महात्मा फुले : आधुनिक भारताचे शिल्पकार!

डॉ. श्रीमंत कोकाटे

महात्मा फुले हे केवळ बोलके सुधारक नव्हते, तर ते प्रत्यक्ष कृती करणारे महामानव होते. त्यांनी आपल्या देशात सार्वजनिक आणि मोफत शिक्षणाचा पाया घातला. शिक्षणाचे महत्त्व सांगणारे 'तृतीयरत्न' नावाचे नाटक त्यांनी लिहिले. मुलींच्या शिक्षणाची सुरुवात आपल्या पत्नीला शिक्षित करून केली. महात्मा फुले यांनी १८४८ साली मुलींची आणि १८५१ साली मुलांची शाळा सुरू केली. तत्पूर्वी, ब्राह्मण मुलींनादेखील शिक्षण घेण्याचा अधिकार नव्हता. सर्व वर्णातील स्त्रियांचे स्थान अतिशूद्रात होते. महात्मा फुले यांनी शाळा सुरू करण्यापूर्वी मोफत आणि सर्वांसाठी शिक्षण नव्हते. त्यांनी स्त्रिया, अस्पृश्य, मजूर, शेतकरी या सर्वांसाठी शाळा सुरू केली. महात्मा फुले यांच्या जन्मापूर्वी सुमारे वीस वर्षांपूर्वी छत्रपती शिवाजी महाराजांचे वंशज प्रतापसिंह महाराज वयाच्या गादीवर आले, तेव्हा दुसरा बाजीराव हा पेशवा होता. त्याने छत्रपती प्रतापसिंह महाराजांच्या शिक्षणावर बंदी घातली. छत्रपती शिकला तर शहाणा होईल आणि शहाणा झाला तर तो आपल्या अंकित राहणार नाही, त्यामुळे त्यांना निर्बुद्ध ठेवण्यासाठी बाजीरावाने त्यांच्या शिक्षणावर बंदी घातली होती. चोरून शिकवतील म्हणून त्याने गुप्तहेर नेमले, तेव्हा प्रतापसिंह महाराजांच्या मातोश्री आनंदीबाई त्यांना मध्यरात्री शिकवायच्या. त्या करारी, बाणेदार आणि निर्भीड होत्या. आपला पुत्र अज्ञानी राहू नये म्हणून त्या छत्रपतींना चोरून शिकवायच्या. छत्रपतींची ही अवस्था तर अठरा पगड जाती बारा बलुतेदारांची काय अवस्था असेल? याची कल्पना करा. या विदारक परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर महात्मा फुले आणि सावत्रीबाई फुले यांनी शाळा सुरू केली, ही आपल्या देशातील क्रांतिकारक घटना आहे.

राधाकृष्णन यांनी जन्मल्यानंतरदेखील सर्वांसाठी आणि मोफत शाळा सुरू केली नाही. राधाकृष्णन यांचा जन्म १८८८ सालातील आहे, महात्मा फुले यांनी १८४८ रोजी शाळा सुरू केल्या, म्हणजे राधाकृष्णन यांच्या जन्मापूर्वी ४० वर्षे अगोदर फुले दांपत्याने प्रत्यक्ष सर्वांसाठी मोफत शाळा सुरू केल्या, याउलट राधाकृष्णन हे स्त्री शिक्षणाच्या विरुद्ध होते. ते भारताचे पहिले उपराष्ट्रपती आणि दुसरे राष्ट्रपती होते. सत्तेत असताना सत्तेचा गैरवापर करून त्यांनी स्वतःचा जन्मदिन शिक्षक दिन म्हणून साजरा करायला सुरुवात केली.

महात्मा फुले यांचे साहित्य आणि कार्य जेव्हा महात्मा गांधीनी अभ्यासले, तेव्हा गांधी म्हणाले की खरा महात्मा तर ज्योतिराव फुले आहेत. पारतंत्र्यात बंधने असतात तर स्वातंत्र्यात मुक्ती असते, असे सर्वज्ञ चक्रधर स्वामी म्हणाले होते. १५ ऑगस्ट १९४७ रोजी आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळाले तरी सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, आर्थिक पारतंत्र्य कायम आहे, हे स्पष्ट होते. म्हणूनच फुले, शाहू, आंबेडकर हे राजकीय स्वातंत्र्याबरोबरच सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, आर्थिक स्वातंत्र्यासाठी आग्रह धरत होते. राधाकृष्णन यांच्या नावाने शिक्षक दिन साजरा करणे, ही आपल्या देशातील सांस्कृतिक आणि शैक्षणिक गुलामगिरी आहे.

महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांचे एक छायाचित्र समग्र सावित्रीबाई फुले समग्र वाङ्मयात उपलब्ध आहे. हा फोटो आहे. हा फोटो जाणीवपूर्वक काढलेला नसून तो सहज काढलेला आहे. या फोटोत सावित्रीबाई या महात्मा फुले यांच्या उजव्या बाजूस आहेत. हा फोटो ठरवून काढलेला नाही. नकळत काढलेला आहे, पण यातून हे लक्षात येते की महात्मा फुले यांच्या केवळ जाणिवेतच नव्हे तर, नेणिवेतदेखील स्त्री ही पुरुषांपेक्षा उजवी म्हणजेच कर्तृत्ववान आहे, ती डावी म्हणजेच दुय्यम दर्जाची नाही, यावर त्यांचा दृढ विश्वास होता. त्यांनी स्त्रियांचा आदर सन्मान केला. त्यांना स्वातंत्र्य दिले. त्याची सुरुवात त्यांनी कुटुंबापासून केली. फुले दाम्पत्याला अपत्य नव्हते, पण त्याचा संकोच किंवा न्यूनगंड त्यांनी कधीही बाळगला नाही. महात्मा फुलेंचे व्यक्तिमत्त्व जसे जातीभेदाच्या पलीकडे गेले होते, तसेच लिंगभेदाच्या पलीकडे गेले होते. राधाकृष्णन हे स्त्री स्वातंत्र्याबाबत सकारात्मक नव्हते. त्यांनी पत्नीला स्वातंत्र्य दिले नाही. ते खूप सनातनी आणि कर्मठ विचारांचे होते. महात्मा फुले यांनी प्रथमतः स्वतः च्या पत्नीला शिकवले.



प्रथमतः मुलींची शाळा सुरू केली. स्त्री शूद्रांना शिकवतो म्हणून सनातन्यांनी वडिलांचे कान भरले. शिक्षणाचे काम बंद करण्यासाठी वडिलांनी घर सोडण्याचा इशारा दिला. महात्मा फुलेंनी घर सोडले, पण शिक्षणाचे काम सोडले नाही. मुलगी शिकली तरच सामाजिक परिवर्तन होईल, ही फुलेंची भूमिका होती. त्यांनी विधवांच्या केशवपणाला कडाडून विरोध केला. यासाठी त्यांनी नाभिकांची संघटना उभारली. बालविवाह या प्रथेला विरोध केला. विधवा विवाहाला चालना दिली. भ्रूणहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना करून महिलांना-भ्रूणांना जीवदान दिले. अशा प्रकारचे क्रांतिकार्य राधाकृष्णन यांच्या स्वप्नात देखील नव्हते. महात्मा फुले हे महान साहित्यिक होते. ते चाकोरीबद्ध साहित्यिक नव्हते तर ते बहुआयामी साहित्यिक होते. ते नाटककार होते. त्यांनी तृतीय रत्न नावाचे नाटक लिहिले. नाटकाचा विषय जसा मनोरंजनाचा आहे, तसाच तो प्रबोधनाचा विषय आहे, हे त्यांनी दाखवून दिले. ते शाहीर होते त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा ९०८ ओळींचा पोवाडा लिहिला, तो त्यांनी गायला. म्हणजे ते शिवशाहीर होते. त्यांनी गुलामगिरी नावाचा ग्रंथ लिहिला. ते धर्मशास्त्राचे अभ्यासक होते. त्यांनी धार्मिक चिकित्सा केली. त्यांनी 'शेतकऱ्यांचा आसूड' लिहून शेतकरी प्रश्नांना वाचा फोडली. त्यांनी सार्वजनिक सत्यधर्म लिहून मोठा धार्मिक पर्याय दिला. एक व्यक्ती एका आयुष्यात किती लेखन, संशोधन, प्रबोधन करू शकतो याचे हे क्रांतिकारक उदाहरण आहे. मात्मा फुले यांनी जनमानसाची मराठी भाषा प्रथमतः साहित्यात आणली, असे ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त डॉ. भालचंद्र नेमाडे म्हणतात. केवळ पुणेरी मराठी म्हणजेच प्रमाण भाषा आहे, असे नव्हे तर कष्टकरी, श्रमकरी, शेतकऱ्यांची मराठी भाषा साहित्यात आणून तिचा गौरव केला. विष्णुशास्त्री चिपळूणकर जेव्हा म्हणाले की फुलेंच्या साहित्यात व्याकरण आणि शुद्धलेखन नाही. फुलेंनी त्यांना कृती करून उत्तर दिले. फुलेंच्या सहित्यात व्याकरण नसेल, पण त्यात जनमानसाचे अंतःकरण आहे. केवळ सनातन्यांची भाषा हीच प्रमाण भाषा आहे,असा आग्रह धरून श्रमकरी वर्गात न्यूनगंडाची भावना निर्माण करणाऱ्याना म. फुले यांनी ग्रंथनिर्मिती करून सणसणीत उत्तर दिले व श्रमकऱ्यांमध्ये प्रचंड आत्मविश्वास निर्माण केला. आपल्या देशातील महान क्रांत्या लोकभाषेतून झालेल्या आहेत. गौतम बुद्धांनी पाली भाषेतून, महाविरांनी अर्धमागधी भाषेतून, बसवण्णानी कन्नड भाषेतून, चक्रधर-नामदेव-तुकारामांनी मराठी भाषेतून, गुरू नानकांनी पंजाबी भाषेतून क्रांती केली. फुलेंनीदेखील लोक भाषेतून क्रांती केली. महात्मा फुलेंचे इंग्रजी भाषेवर प्रभुत्व होते. ते संस्कृतचे जानकार होते. पण क्रांतीसाठी लोकभाषाच त्यांनी वापरली.

महात्मा फुले यांनी १८६९ साली रायगडावर जाऊन शिवरायांच्या समाधीचा शोध घेतला. पुण्यात येऊन शिवजयंती उत्सवाला सुरुवात केली. त्यांनी ९०८ ओळींचा शिवरायांच्या जीवनावरील आधुनिक काळातील पहिला महत्त्वपूर्ण पोवाडा लिहिला. जिजामाता याच शिवाजीराजांच्या गुरू आहेत, अशी मांडणी महात्मा फुले करतात. शिवचरित्राचा वापर विधायक कार्यासाठी महात्मा फुले यांनी केला. थोर समाजसुधारक भाई माधवराव बागल म्हणतात, "शिवस्मारकाची कल्पना प्रथम महात्मा फुले यांचीच होती." आधुनिक काळात वास्तव शिवचरित्र घरोघरी पोहोचविणारे महात्मा फुले हे खरे शिवशाहीर आहेत. शिवचरित्राची अस्सल साधनं हाताशी नसताना वास्तव इतिहासाकडे कसे पोहोचावे, ही फुलेंची अन्वेषणपध्दती सांगते. महात्मा फुले हे संशोधकांचे दीपस्तंभ आहेत. भूमीपुत्रांच्या हक्कासाठी दिवसा रस्त्यावरची लढाई तर रात्री त्यांचा इतिहास शोधण्यासाठी पुस्तकांशी लढायचे असे महात्मा फुले यांचे कार्य होते. धर्माच्या नावाखाली बहुजनांचे शोषण होत होते, त्याला पायबंद घालण्यासाठी महात्मा फुले यांनी "गुलामगिरी" या ग्रंथातून धर्मचिकित्सा केली. जागतिक कीर्तीचे प्राच्यविद्यापंडित शरद पाटील म्हणतात "भारतीय मुक्ती समस्येचे उत्तर अचूक शोधणे शक्य व्हावे अशा रीतीने महात्मा फुलेंनी ती उभी केली हीच फुलेवादाची महत्ता आहे." महात्मा फुले यांच्या कार्यकर्तृत्वाचा व एकूण विचारधारेला तत्वज्ञानाच्या चौकटीत बसवण्याचे महान कार्य शरद पाटील यांनी केले आहे. फुले महान तत्वज्ञानी होते, यालाच शरद पाटील फुलेवाद म्हणतात. त्यांनी कष्टकरी, शेतकरी आणि महिलांच्या हिताचे तत्वज्ञान मांडले. सामान्य जनमानसाला शिक्षण, आत्मविश्वास, वैज्ञानिक दृष्टीकोन, समानता याचे महत्त्व सांगणारे फुले हेच खरे देशभक्त आहेत, असे महर्षी वि. रा. शिंदे सांगतात. महर्षी शिंदे यांनी महात्मा फुले यांच्या जीवनावर "सत्याचा पालनवाला। जोतीबा माझा।" या नावाचा पोवाडा लिहिला. महात्मा फुले यांनी संपूर्ण आयुष्यभर धोरणात्मक क्रांतिकारक कार्य केले. सन १८६३ त्यांनी भ्रूणहत्या रोखण्यासाठी विधवांच्या आधार केंद्राची स्थापना केली. १८६४ साली पुनर्विवाहाची प्रथा सुरू केली. १८७५ साली शेतकऱ्यांना गांजणाऱ्या सावकारशाही विरुद्ध लढा सुरू केला. पुढे इंग्रजांना त्याविरुद्ध कायदा करावा लागला. अन्यायाविरुद्ध लढण्यासाठी १८७५ साली दीनबंधू नावाचे नियतकालिक सुरू केले. १८७७ पडलेल्या दुष्काळात हजारो लोकांना अन्नदान केले. कामगारांना हक्क अधिकार वेतन सुरक्षितता सुट्टी मिळावी यासाठी १८७९ साली कामगार संघटनेची स्थापना केली व नारायण मेघाजी लोखंडे यांना अध्यक्षपदी नेमले. सर्वांना मोफत आणि सक्तीचे शिक्षण मिळाले पाहिजे यासाठी १८८२ साली त्यांनी हंटर कमिशनपुढे साक्ष दिली. अशा प्रकारचे कार्य राधाकृष्णन यांच्या स्वप्नातदेखील नव्हते. महात्मा फुले म्हणजे क्रांतिकारक कार्याचा सूर्य आहे.

महात्मा फुले यांनी १८७३ साली सत्यशोधक समाजाची स्थापना केली. असत्य नाकारून सत्याचा पुरस्कार करणे. अज्ञान, अंधश्रद्धा, कर्मकांड, अनिष्ट प्रथा यांचा त्याग करणे. धार्मिक क्षेत्रातील दलाल नाकारून आपले धार्मिक कार्य आपणच करणे, यावर त्यांनी भर दिला. सत्यशोधक पद्धतीने विवाह करायला सुरुवात केली. त्यांनी सार्वजनिक सत्यधर्माचा पाया घातला. आधुनिक भारतात जनहिताचा धर्म त्यांनी दिला. त्यांनी आपला अनुबंध बळीराजा, जोतिबा, खंडोबा, बहिरोबा,शिवाजी महाराज अर्थात भारतीय संस्कृतीत आहे, असे गुलामगिरीत मांडले. त्यांची मांडणी ब्राह्मणी विरुद्ध अब्राह्मणी अशी आहे.

महात्मा फुले श्रीमंत होते. ते जमीनदार होते. ते बांधकाम व्यावसायिक होते. खडकवासला धरण, अनेक पूल, कात्रजचा जुना बोगदा याचे बांधकाम महात्मा फुले यांच्या कंपनीने केलेले आहे. त्यातून मिळालेला पैसा महात्मा फुले यांनी शिक्षणासाठी आणि सामाजिक परिवर्तनासाठी वापरला, म्हणूनच सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती पी. बी. सावंत म्हणतात "शिक्षण आणि समाजपरिवर्तनासाठी या भूमीत कायावाचामने चंदनासारखा झिजलेला पहिला (आधुनिक काळातील) महापुरुष म्हणजे जोतीराव फुले आहेत." संपत्तीचा वापर केवळ व्यक्तिगत कुटुंबासाठी नव्हे तर सकल मानवी कल्याणासाठी करणारे फुले हे सामाजिक परिवर्तन क्षेत्रातील संत आहेत. महात्मा फुले यांचे विचार सडेतोड आहेत. ते क्रांती करणारे आहेत. महात्मा फुले यांनी लेखणीच्या व प्रबोधनाच्या माध्यमातून आपल्या वैचारिक विरोधकांना प्रत्युत्तर दिले. फुले हे तडजोडवादी नव्हते. त्यानी कधी आपल्या विरोधकांशी हातमिळवणी केली नाही, पण माणुसकी मात्र कायम जपली, त्यामुळेच महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात "जोतीबा की नीति और उनका तत्त्वज्ञान यही लोकतंत्र का एक मात्र सच्चा मार्ग है।". डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे जागतिक कीर्तीचे विद्वान होते. ते अर्थतज्ज्ञ, शिक्षणतज्ज्ञ, इतिहासतज्ज्ञ, घटनातज्ज्ञ, जलतज्ज्ञ, कृषीतज्ज्ञ, धर्मशास्त्राचे अभ्यासक होते. त्यांनी आपल्या आयुष्यात गौतम बुद्ध, संत कबीर आणि महात्मा फुले यांना गुरुस्थानी मानले. यातूनच महात्मा फुले यांचे मोठेपण सिद्ध होते. महात्मा फुले यांनी शैक्षणिक, धार्मिक आणि सामाजिक परिवर्तनाच्या क्षेत्रात केलेल्या कार्याचा गौरव करताना महाराजा सयाजीराव गायकवाड म्हणतात "फुले हे भारताचे वॉशिंग्टन आहेत", तर शाहू महाराज म्हणतात "फुले हे भारताचे मार्टिन ल्युथर आहेत" महाराजा सयाजीराव गायकवाड आणि शाहू महाराज यांनी सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, शैक्षणिक, कृषी, कला, क्रीडा क्षेत्रात आमूलाग्र क्रांती केली. त्यांनी जग पाहिले होते. महाराजा सयाजीराव गायकवाड हे अमेरिकेत झालेल्या दुसऱ्या जागतिक सर्वधर्म परिषदेचे अध्यक्ष होते, जर्मनीत झालेल्या ऑलिंपिकचे प्रमुख पाहुणे होते. ब्रिटिश लायब्ररीचे अध्यक्ष होते. लंडन येथे भरलेल्या पहिल्या मानवशास्त्र परिषदेचे अध्यक्ष होते. देशातील अनेक परिषदांचे ते अध्यक्ष होते. असे विश्वविख्यात विद्वान कर्तृत्ववान राजे सयाजीराव गायकवाड महात्मा फुलेंच्या कार्याची तुलना वॉशिंग्टनशी करतात. त्यांचा महात्मा फुलेंशी प्रत्यक्ष संबंध आला. महात्मा फुले यांच्या विचारांचा महाराजांवर प्रभाव होता. महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्याप्रमाणेच कर्तृत्ववान राजे छत्रपती शाहूमहाराजांनी आपल्या राज्यात सत्यशोधक चळवळीला प्रोत्साहन दिले. शाहू महाराजांनी महात्मा फुलेंच्या कार्याची तुलना मार्टिन ल्युथरशी केलेली आहे. यावरून स्पष्ट होते की महात्मा फुलेंचे कार्य वैश्विक स्तराचे आहे. राधाकृष्णन फुलेंच्या पासंगाला देखील पुरत नाहीत.

महात्मा फुले यांना ब्राह्मणद्वेष्टे ठरवणाऱ्यांनी लक्षात घ्यावे की त्यांनी पीडित काशीबाई नातू या विधवा ब्राह्मण महिलेला आधार दिला. तिच्या यशवंत या मुलाला दत्तक घेतले व त्याला डॉक्टर बनविले आणि त्याचे आपल्या नात्यातील मुलीशी लग्न लावून दिले, इतके ते मानवतावादी म्हणजेच जातिव्यवस्थेच्या विरोधात होते. महर्षी कर्वेंनी मराठा मुलींनादेखील शाळेत प्रवेश नाकारला. महर्षी वि.रा. शिंदे जेव्हा बहीण जनाक्का शिंदे यांना प्रवेश घेण्यासाठी कर्वेंच्या शाळेत, तेव्हा कर्वेंनी नाकारला, महात्मा फुलेंनी ब्राह्मण मुलींनादेखील शिक्षण दिले. कर्वेंना भारतरत्न मिळाला, पण महात्मा फुले यांना पुरस्कार मिळाला नाही. महात्मा फुले यांचा ब्राह्मणी व्यवस्थेविरुद्ध वैचारिक संघर्ष होता, पण व्यक्तिगत द्वेष, आकस, कटुता त्यांनी कधीही बाळगली नाही. त्यांनी ब्राम्हणांचे अहित व्हावे अशी कधीही भूमिका घेतली नाही. ब्राम्हणांच्या हिताबरोबरच बहुजन समाजाचे हित व्हावे यासाठी त्यांचा संघर्ष होता. पण येथील अस्पृश्य, स्त्रियांचे कल्याण व्हावे यासाठी राधाकृष्णन यांनी संघर्ष केला नाही. महात्मा फुले हे जात, धर्म, प्रांत, राष्ट्र या सीमा ओलांडून वैश्विक बंधुत्व निर्माण करणारे महापुरुष आहेत. संकुचित राष्ट्रवाद त्यांना मान्य नव्हता. एकमय समाज म्हणजे राष्ट्र, हा त्यांचा राष्ट्रवाद आहे. ते म्हणतात "ख्रिस्त महंमद मांग ब्राह्मणासी धरावे पोटाशी बंधुपरी" हा त्यांचा प्रगल्भ मानवतावादी वैश्विक विचार होता. स्वतःच्या घरातील पाण्याचा हौद सर्वांसाठी खुला करून अस्पृश्यता निर्मूलनाची सुरुवात त्यांनी स्वतःपासून केली. त्यांचा राष्ट्रवाद वैश्विक होता. त्यांचा राष्ट्रवाद वंश, धर्म किंवा भूगोल यावर आधारलेला नव्हता. विश्वातील सर्व मानवांचे कल्याण असा त्यांचा राष्ट्रवाद होता.

महात्मा फुले निर्भीड होते. ते कणखर होते. त्यांनी संकटावर मात करून यश मिळविले. ते पलायनवादी नव्हते, तर ते लढवय्ये होते. कठीणप्रसंगी ते निराश-हताश होऊन बसले नाहीत. ते स्वाभिमानी होते, तसेच ते संवेदनशील मनाचे होते. ते जितके कर्तव्यकठोर होते, तितकेच ते विनयशील होते, परंतु विचाराबाबत त्यांनी कधीही तडजोड केली नाही. ते निःस्वार्थी होते. ते प्रचंड कनवाळू होते. ते नीतिमान होते. राधाकृष्णन यांच्या नैतिकतेवर चर्चा करणे, हे अप्रस्तुत आहे असे मला वाटते.

महात्मा फुले यांनी आपल्या देशात सर्वांसाठी मोफत शिक्षण सुरू केले, त्यामुळे त्यांच्या नावानेच आपल्या देशातला "शिक्षक दिन" झाला पाहिजे. राधाकृष्णन यांच्या जन्माअगोदार ४० वर्षांपूर्वी फुलेंनी सार्वजनिक आणि मोफत शिक्षण सुरू केले. राधाकृष्णन हे स्त्री शिक्षणाबाबत सनातनी विचारांचे होते. त्यांनी सनातनी विचारांचा पुरस्कार केला. महात्मा फुले यांचे साहित्य उत्स्फूर्त साहित्य आहे. राधाकृष्णन यांनी एका तरुण विद्यार्थ्याचा पीएच.डी. प्रबंध चोरून स्वतःच्या नावावर प्रकाशित केला. त्यांच्या विरुद्ध कलकत्ता न्यायालयात खटला चालला, पण सत्तेचा गैरवापर व दडपशाही करून तो खटला मागे घेण्यास भाग पाडले.

राधाकृष्णन हे साहित्यिक चोर होते. चोराच्या नावाने शिक्षक दिन साजरा करणे हा शिक्षकांचा, विद्यार्थ्यांचा, शिक्षण क्षेत्राचा अर्थात आपल्या देशाचा अपमान आहे. तो अपमान दूर करण्यासाठी महात्मा फुले यांच्या नावाने शिक्षक दिन साजरा करणे उचित आहे. त्यांच्या नावाने शिक्षक दिन साजरा करणे, हीच महात्मा फुलेंप्रती कृतज्ञता आहे. **

# वार्षिक स्नेहसंमेलन विद्यार्थ्यांसाठी वरदान

प्रमोद जाधव



विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी शाळांमध्ये वार्षिक स्नेहसंमेलनाचा हंगाम सुरु झाला आहे. नाटक, वेगवेगळ्या गाण्यांवर नृत्य तसेच गाण्यांचे सादरीकरण करण्याची संधी या व्यासपिठातून मिळत असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. त्याची लगबग आता वेगवेगळ्या शाळांमध्ये दिसून येत आहे. शिक्षणाव्यतिरिक्त वेगवेगळ्या कला सादर करण्याची संधी उपलब्ध होत आहे. उत्साह, आनंद, आत्मविश्वासवाढीसाठी वार्षिक स्नेहसंमेलन विद्यार्थ्यांसाठी वरदान ठरत असल्याचे चित्र आहे.

जून महिन्यात शाळा सुरु झाल्यावर अभ्यास, परीक्षा, वक्तृत्व, चित्रकला स्पर्धांमध्येच विद्यार्थी अडकून जातात. सकाळी शाळेत जाणे, संध्याकाळी घरी आल्यावर शाळेचा अभ्यास करणे, हा दिनक्रम चालू असतो. परंतु, अभ्यासाव्यतिरिक्त विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी शाळा, महाविद्यालयांमध्ये वार्षिक स्नेहसंमेलनसारखा आगळावेगळा उपक्रम राबविला जात आहे. डिसेंबर महिना सुरु झाल्यावर वार्षिक स्नेहसंमेलनाची तयारी सुरू होते. विद्यार्थ्यांकडून नाटक व नृत्य, गाण्यांचा सराव करून घेण्यासाठी शिक्षकांसह पालकवर्गदेखील प्रचंड मेहनत घेतात. आपल्या आवडीचे नाटक, नृत्य करण्याची संधी मिळत असल्याने विद्यार्थीदेखील या उपक्रमात उत्स्फुर्तपणे सहभाग घेतात. पूर्वी शाळांमध्ये वार्षिक स्नेहसंमेलन साध्या पध्दतीने साजरा केले जात होते. मोजकेच नाटक, नृत्यांचे सादरीकरण करून हा उत्सव साजरा करण्यावर भर दिला जात होता. परंतु, दिवसेंदिवस वार्षिक स्नेहसंमेलनाचा क्रेझ वाढत आहे. शाळांमध्ये वार्षिक स्नेहसंमेलन धूमधडाक्यात साजरा व्हावा, यासाठी शिक्षकांसह शाळा व्यवस्थापन समिती, माजी विद्यार्थी तसेच कलेचे ज्ञान असलेले कलावंतदेखील पुढाकार घेत असल्याचे चित्र आहे. त्यामध्ये पालकदेखील कमी नसल्याचे दिसून येत आहे.

आता सोशल मीडियासह वेगवेगळ्या माध्यमातून नृत्य, नाटक, गाण्यांचा सराव करण्याचे साधन उपलब्ध झाले आहेत. काही विद्यार्थी वेगवेगळ्या अकॅडमीमार्फत नृत्यांचा सराव करीत आहेत. त्यामुळे वार्षिक स्नेहसंमेलनात मोठ्या आत्मविश्वासाने विद्यार्थी त्यांची कला सादर करतात. काही शाळांमध्ये संगीत शिक्षकांसह सांस्कृतिक कार्यक्रम घेणारे शिक्षकही मेहनत घेतात. त्यामुळे शहरी भागाप्रमाणेच ग्रामीण भागातील शाळांमध्ये दर्जेदार सांस्कृतिक कार्यक्रम होत आहेत. विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना व्यासपीठ मिळवून देण्याचे उत्तम साधन म्हणून वार्षिक स्नेहसंमेलनाकडे पाहिले जाते. अभ्यासाव्यतिरिक्त विद्यार्थ्यांच्या अंगातील वेगवेगळ्या कला स्नेहसंमेलनातून पुढे येतात. मुक्तपणे व्यक्त होण्याची संधी संमेलनातून प्राप्त होत आहे. यातून अनेक विद्यार्थी भविष्यात अभिनेते, कलाकार होऊन आपल्या गावाचे, शाळेचे, तालुका जिल्ह्याचे नाव लौकिक करतात. त्यामुळे वार्षिक स्नेहसंमेलनात सहभाग घेणाऱ्यांची संख्यादेखील वाढत आहे.

डिसेंबर महिना सुरु झाला आहे. गेल्या काही दिवसांपासून शाळा, महाविद्यालयांमध्ये स्नेहसंमेलनाची तयारी वेगाने सुरु आहे. काही शाळांमध्ये स्नेहसंमेलनाचे कार्यक्रमही घेण्यात आले आहेत. विद्यार्थी आपापल्या परीने त्यांची कला सादर करण्याचे काम करीत आहेत. डिसेंबरच्या दुसऱ्या आठवड्यापर्यंत वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा शाळा, महाविद्यालयात रंगणार आहे. त्यानुसार तयारीदेखील शाळा महाविद्यालयात सुरु झाली आहे. स्नेहसंमेलनात कोणती कला सादर करायची याबाबत घराबरोबरच शाळेत येता-जाता अनेक विद्यार्थ्यांची चर्चा होत आहे. काही शाळांमध्ये रिॲलिटी शोप्रमाणे स्नेहसंमेलनाचा कार्यक्रम घेऊन वार्षिक स्नेहसंमेलनाचा उत्सव साजरा केला जात आहे. काही शाळांमध्ये बेटी बचाव, पाणी बचावसारखे संदेश नृत्य व नाटकाद्वारे देण्याचा प्रयत्न केला जात आहे. काही ठिकाणी देशभक्तीपर गीतांवरही भर दिला जात आहे. देशासाठी बलिदान देणाऱ्या महापुरुषांची ओळख आजच्या पिढीला राहावी यासाठी वार्षिक स्नेहसंमेलनातून त्यांना मानवंदना देण्याचे काम केले जात आहे. त्यामुळे जिल्ह्यामध्ये वार्षिक स्नेहसंमेलनाचा हंगाम सुरु झाला आहे. या हंगामात एकरूप होऊन विद्यार्थी आपली कला सादर करण्याचे काम करीत आहेत. उत्साह, आनंद, आत्मविश्वासवाढीसाठी वार्षिक स्नेहसंमेलन विद्यार्थ्यांसाठी वरदान ठरत असल्याचे चित्र आहे. **

# विनोदवीर, हास्य कलाकारांना सलाम

निलेश साठे



या जगामध्ये जितके कॉमेडी किंग आहेत विनोद वीर,हास्य कलाकार आहेत त्यांचं मला मोठं कौतुक वाटतं. कसं काय सुचतं त्यांना एवढं सगळं. ही खरंतर दैवी देणगी आहे. अगदी छोट्या-छोट्या गोष्टीत ते विनोद करतात आणि आपल्या सर्वसामान्यांच्या चेहऱ्यावर हास्य खुलवतात. अजब आहे हे सर्व. चार्ली चापलीन मिस्टर बीन, जॉनी लिव्हर, कपिल शर्मा, अशोक सराफ, समीर चौगुले, भारती सिंग या आणि अशाच सर्व कॉमेडीवरांना मनापासून अगदी मनापासून धन्यवाद द्यावसं वाटतं. गोष्ट एकदम किरकोळ असते, पण ती सादर करण्याची यांची ताकद अफाट आहे. अफलातून असं काहीतरी करतात की सर्वसामान्य रसिक प्रेक्षकांच्या तुम्हा आम्हा सर्वांच्या चेहऱ्यावर नकळतपणे हास्य खुलून जाते. आणि आपण काही वेळ का होईना, आपल्या आयुष्यातील दुःख विसरून जातो. लेखकाने लिहिलेले आपण वाचले तर कदाचित आपल्याला हसू येणार नाही. पण, तेच लेखकाने लिहिलेले या लोकांनी सादर केलं तर मात्र आपल्या चेहऱ्यावर हास्य खुलते. ही जी त्यांची सादर करण्याची अफाट कला आहे, त्या कलेला मनापासून धन्यवाद द्यावेसे वाटते.

एकदा एकाने जोक सांगितला. एक दिवस टोण्याने आजीला विचारले, आजी आपण आपल्या घरामध्ये पाच माणसे आहोत, तू, मी, मम्मी, पप्पा आणि दीदी. पण दीदीचं लग्न झालं की आपण चारच होणार. हो ना.

त्यावर आजी म्हणते, हो पण तुझं लग्न झालं की आपण परत पाच होणार.

त्यावर टोण्या म्हणतो तू मेलीस की मी परत चार होणार. मग मात्र चिडून आजी तुझा मुडदा बसवला तुझा असं म्हणून ज्या काही शिव्या घालते त्या अफलातून. खरे तर बोलणं ही एक कला आहे. त्यात विनोदी ढंगाचं बोलणं असेल तर तो आपला खरा दागिनाच. पण हे लेणं प्रत्येकाला लाभत नाही. चार्ली चापलीन मिस्टर बीन हे कधीही बोलले नाहीत. त्यांनी न बोलताच फक्त देहबोलीवरून किंवा हातवारे इशारे करून संपूर्ण जगाला हसवलं. जॉनी लिव्हर म्हणजे विनोदांचा खळाळता झरा. कॉमेडी करून हिरो बनता येतं हे जॉनी यांनी दाखवून दिलं. दादा कोंडके अशोक सराफ यांनी केवळ विनोदाच्या उत्तम टायमिंग वर रसिक प्रेक्षकांना हसतं ठेवलं. अशोक सराफ यांचे चेहऱ्यावरील हावभाव अक्षरशः बघण्यासारखे असतात. विनोदाचं अचूक ज्ञान आणि उत्तम टाइमिंगच्या जोरावर त्यांनी मराठी चित्रपट सृष्टीत वेगळा ठसा उमटवलाय. खूप नावही कमावलं.

आजच्या घडीला कपिल शर्मा नावाचे एक ब्रँड तयार झालेलं आहे. पोट धरून आणि खळखळून हसायचं असेल तर कपिल शर्माचा शो पहा. अतिशय उत्तम टाइमिंग साध्या साध्या आणि किरकोळ गोष्टींवर उत्तम विनोद. खूप छान कार्यक्रम आहे.

मराठीमध्ये आता समीर चौगुले नावाचा ब्रँड बनत चालला आहे. अफलातून टॅलेंट या व्यक्तीमध्ये भरलं आहे. अतिशय उत्तम विनोदी नट. महाराष्ट्राची हास्य जत्रा या कार्यक्रमाच्या माध्यमातून ते घराघरात पोहोचले. देश-विदेशात त्यांचे शो होऊ लागले आहेत.

समीर चौगुले हे लेखक म्हणून जेवढे ग्रेट आहेत त्याच्यापेक्षा कितीतरी अधिक पटीने उत्कृष्ट कॉमेडी वीर नट आहेत. समोर समीर चौगुले यांचा कोणतंही स्कीट पहा तुम्ही खळखळून हसणारच याची शंभर टक्के खात्री. महाराष्ट्राची हास्य जत्रा या कार्यक्रमातील जवळजवळ सर्वच कलाकार सर्वोत्तम कॉमेडी किंग आहेत. जेव्हा भी तुम्हाला कधी उदास वाटेल कंटाळा आला असेल नकारात्मकता आली असेल तेव्हा महाराष्ट्राची हास्य जत्रा हा कार्यक्रम अवश्य पहा नक्कीच खळखळून आणि पोट धरून हसाल. मी नेहमीच हा कार्यक्रम पाहतो.

स्वतःच्या आयुष्यातील दुःख टेन्शन बाजूला सारून दुसऱ्याच्या आयुष्यात सुख समाधान आणि आनंद पसरवणाऱ्या या सर्व हास्य कलाकारांना म्हणूनच धन्यवाद द्यावेसे वाटतात. आपण मनोरंजन म्हणून जरी कार्यक्रम पाहात असलो तरी अशा कॉमेडी आणि विनोदी कार्यक्रमामुळे आपल्या आयुष्यातील आपण दुःख विसरून जातो ही गोष्ट आपल्याला कधीही नाकारता येणार नाही. म्हणूनच महाराष्ट्रातीलच नव्हे आणि हिंदुस्थानातील नव्हे तर संपूर्ण जगभरात जेवढे कॉमेडी किंग आहेत, हास्यवीर आहेत, विनोदी कलाकार आहेत, त्या सर्वांचे मनापासून अगदी मनापासून धन्यवाद. सर्वसामान्यांच्या जीवनातील दुःखाला तुम्ही दूर सारून अखंड मानव जातीला निराशाच्या गर्तेतून बाहेर काढतात, त्यामुळे संपूर्ण मानवी जीवनातील हास्य कलाकारांचे महत्त्व अतिशय उच्चस्थानी आहे. म्हणून सर्व हास्यकलाकारांना मानाचा मुजरा त्रिवार सलाम. **

## स्कॉलरशिप परीक्षा : गणिती सूत्रे, क्लृप्त्या व युक्त्या

# दशांश अपूर्णांक

आकडेमोड
राजेंद्र पाटील
९८२२३०२०८५

दशांश म्हणजे अशा संख्या ज्यांचे दोन भाग असतात. एक पूर्ण संख्येचा भाग आणि दुसरा अपूर्णांक भाग. दोन्ही दशांश बिंदूने विभक्त केले जातात. दोन भाग वेगळे करणाऱ्या बिंदूला दशांश बिंदू म्हणतात. दशांश ही संख्या पूर्णांक आणि पूर्णांक नसलेल्या स्वरुपात दर्शविते. आपल्या दैनंदिन जीवनात दशांश प्रणाली आपण वापरतो. जेव्हा आपण पैसे, लांबी, वजन, इत्यादींशी व्यवहार करतो तेंव्हा आपण नेहमी दशांश प्रणाली वापरतो. दशांशप्रणाली अशा परिस्थितीत वापरली जाते जेथे एखाद्याला संपूर्ण संख्येपेक्षा अधिक अचूकतेची आवश्यकता असते.

दशांश अपूर्णांक गणित हे अपुर्णांकांच्या दशांश स्वरूपाचे प्रतिनिधित्व आहे. ज्याचा भाजक १० ची किंवा उच्च शक्ती आहे. जसे की, १००,१०००,१०००० इ.उदाहरणार्थ १/१०, १/१००, १/१००० दशांशअपूर्णांक आहेत. जर आपण ते ०.१, ०.०१, ०.००१ इत्यादी दशांश स्वरुपात लिहू शकतो. अपूर्णांकांचे विभाजनकरणेअपूर्णांकाचागुणाकार करणे इ. सारख्या दशांश अपूर्णांकाच्या स्वरुपात दर्शविल्या जाणाऱ्या गणिती समस्या सोडविणे सोपे आहे.

१) ज्या अपूर्णांकाचे छेद १० किंवा १०० किंवा १००० असे असतात तेंव्हा ते दशांश पध्दतीने लिहितात.

२) दशांश अपूर्णांकातील टिंबाला दशांश चिन्ह म्हणतात. दशांश चिन्हाच्या डावीकडील संख्या पूर्णांक असते आणि उजवीकडील संख्या अपूर्णांक असते.

३) दशांश अपुर्णांकातील १२.४५ ही संख्या १२ दशांश चार-पाच अशी वाचतात १२.४५ या संख्येतील ४ हा अंक दशांशस्थानी असून, त्याची स्थानिक किंमत ४/१० अशी आहे. ५ हा अंक शतांश स्थानी असून त्याची किंमत ५/१०० अशी आहे.

४) ५/१० ही संख्या दशांश अपूर्णांकात ०.५ अशी लिहितात

५/१०० ही संख्या दशांश अपूर्णांकात ०.०५ अशी लिहितात

५/१००० ही संख्या दशांश अपूर्णांकात ०.००५ अशी लिहितात

५) ०.२७५ या संख्येतील २ हा अंक पहिल्या दशांश स्थानी आहे. ७ हा अंक दुसऱ्या दशांश स्थानी आहे आणि ५ हा अंक तिसऱ्या दशांश स्थानी आहे.

६) २.७ ही संख्या दोन पूर्णांक सात दशांश अशी वाचतात.

७) २.४५ ही संख्या दोन पूर्णांक पंचेचाळीस शतांश अशी वाचतात.

८) २.२७५ ही संख्या दोन पूर्णांक दोनशे पंचाहत्तर सहस्त्रांश अशी सुध्दा वाचतात.

**दशांश अपूर्णांकांची बेरीज**

१) दशांश अपूर्णांकांची बेरीज शक्यतो उभ्या मांडणीत करावी.

२) बेरीज करावयाच्या संख्या एकाखाली एक अशा लिहिताना त्यांची दशांश चिन्हे एकाखाली एक यावीत. त्याखालीच बेरजेतील दशांश चिन्ह यावे. रिकाम्या स्थानी ० लिहावे.

जसे १३.५ + २.४५ + ७.०७५ =?

उदा १३.५००
२.४५०
७.०७५
उत्तर २३.०२५

दशांश अपूर्णांकांचीवजाबाकी

१) दशांश अपूर्णांकांची वजाबाकीशक्यतो उभ्या मांडणीत करावी.

२) वजाबाकी करावयाच्या संख्या एकाखाली एक अशा लिहिताना त्यांची दशांश चिन्हे एकाखाली एक यावीत. रिकाम्या स्थानी ० लिहावे.

३) नेहमीप्रमाणे अंकांची वजाबाकी उजवीकडून डावीकडे करीत जावे.

जसे ८५.२५-६८.८ =?

उदा ८५.२५
६८.८०
उत्तर १६.४५

**दशांश अपूर्णांकांचा गुणाकार**

१) दशांश अपूर्णांकांचा गुणाकार करताना त्यातील दशांश चिंन्हे विचारात न घेता नेहमीप्रमाणे गुणाकार करावा.

२) दोन्ही संख्यामधील दशांश स्थानांची बेरीज करून त्या बेरजे इतकी दशांशस्थाने उत्तराच्या गुणाकारात येतील अश्या ठिकाणी दशांश चिन्ह द्यावे.

जसे ० .४ X ०.३ = ०.१२

जसे ०.८ X ०.०३ = ०.०१२

३) दशांश अपूर्णांकाला १० ने गुणल्यास गुणाकारात दशांश चिन्ह एक स्थान उजवीकडे सरकवावे. १०० ने गुणल्यास दशांश चिन्ह दोन स्थाने उजवीकडे सरकवावे आणि १००० ने गुणल्यास दशांश चिन्ह तीन स्थाने उजवीकडे सरकवावे.

जसे ४.६८५ X १० = ४६.८५

४.६८५ X १०० = ४६८.५

४.६८५ X १००० = ४६८५

**दशांश अपूर्णांकांचा भागाकार**

१) दशांश अपूर्णांकांतील संख्येला भागताना भाज्यातील दशांश चिन्हांच्या उजवीकडील अंक भागण्यासाठी घेतला असता भागाकारात दशांश चिन्ह द्यावे.

१२.२५ ÷ ५= २.४५

२) दशांश अपूर्णांकांसभागताना भजकास पूर्णांक रूप द्यावे त्यासाठी भाजकातील दशांश चिन्हापुढे जितकी स्थाने असतील, तितक्या स्थानापर्यंत दशांश चिन्ह उजवीकडे सरकवावे.

३) भजकास पूर्णांक रूप देण्यासाठी जितकी स्थाने दशांश चिन्ह उजवीकडे सरकविले तितकी स्थाने भाज्यामध्ये सुध्दा दशांश चिन्ह उजवीकडे पुढे सरकवावे.

जसे ३.८४ ÷ १.६ = ३८.४ १६= २.४

जसे ३८.४ ÷ ०.१६ = ३८४० १६= २४०

४) दशांश अपुर्णांकास १० ने भागण्यास दशांशचिन्ह एक स्थान डावीकडे सरकवावे. १०० ने भागल्यास दशांश चिन्ह दोन स्थाने डावीकडे सरकवावे आणि १००० ने भागल्यास दशांशचिन्ह तीन स्थाने डावीकडे सरकवावे.

जसे ८७२.४ ÷ १०= ८७.२४

जसे ८७२.४ ÷ १००= ८.७२४

जसे८७२.४ ÷ १०००= ०.८७२४

दशांश अपूर्णांकांचे व्यवहारी अपूर्णांकात रुपांतर

१) दशांश अपूर्णांकांचे व्यवहारी अपूर्णांकात रुपांतर करताना त्यामधील दशांशस्थाने लक्षात घेऊन रुपांतर करावे.

जे २.५ = २ $\frac{५}{१०}$

०.२५ = $\frac{२५}{१००}$

४.००३= ४ $\frac{३}{१०००}$

२) व्यवहारीअपुर्णांकांचे दशांश अपूर्णांकात रुपांतर करताना त्याचा छेद १० किंवा १०० किंवा १००० असल्यास पुढीलप्रमाणे रुपांतर करावे.

जसे $\frac{७}{१०}$ = ०.७

$\frac{२८}{१००}$ = ०.२८

२ $\frac{३}{१०००}$ = २.००३

---

## वाचनीय, प्रेरक जीवनकहाणी

# मु.पो.१०, फुलराणी

पुस्तक परीक्षण
प्रा. शाम जोगळेकर
मो. ९२७३३४३१७७




मु. पो.१०, फुलराणी, हे कोंडाबाई लक्ष्मण पारधे यांचे आत्मकथन मॅजेस्टिक पब्लिशिंग हाऊसने देखण्या रूपात प्रकाशित केले आहे. सिद्धार्थ लक्ष्मण पारधे यांनी या पुस्तकाचे शब्दांकन केले आहे. त्यांचे 'प्रास्ताविक' सुरुवातीला आहे. सिद्धार्थ लिहितात, ''माझ्या हातात लेखणी देणारी माझी आई अशिक्षित आहे. पण लेखकांच्या घरातील भांडी घासताना, निरीक्षणातून कोंडाबाईंनी शिक्षणाचे महत्त्व जाणले होते. त्यामुळे त्यांनी मुलांना कधी रागाने तर कधी प्रेमाने शिक्षण घेण्यास प्रवृत्त केले.'' पुढे सिद्धार्थ लिहितात, ''.. माझ्या आईसारखी आई जर भारतातल्या प्रत्येकाला मिळाली, तर अखंड भारत शंभर टक्के शिक्षित होण्यास काहीच हरकत नाही.'' कोंडाबाईंचे विलक्षण जीवनानुभव कागदावर उतरवण्याचे काम सिद्धार्थ यांनी उत्तम प्रकारे केले आहे. बोलीभाषेतील या पुस्तकात एकूण तेरा प्रकरणे आहेत. त्यांची नावेही विलक्षण आहेत. पुस्तकाचे वेधक, रंगीत मुखपृष्ठ सतीश भावसार यांचे आहे.

सुरुवातीलाच 'आनंदवन' या प्रकरणात सिद्धार्थने, कोंडाबाईंच्या मोठ्या मुलाने, कालोनीतल्या घराची किल्ली हाती देऊन त्यांच्या पायावर डोके ठेवले. हे अविश्वासनीय वृत्त ऐकून कोंडाबाईंच्या तोंडून शब्दच फुटत नव्हते. कोंडाबाई म्हणतात, ''ज्या कालोनीत आमच्या अख्ख्या कुटुंबाने घमेली वाहिली, ज्या बिल्डिंगच्या विटा उचलल्या, ज्या कालोनीत मी लोकांची भांडी घासली. त्याच कालोनीत माझ्या मुलानं घर घेतलं. मी धन्य झाले!''

१०, फुलराणी, हा सत्यदेव दुबे यांचा फ्लॅट सिद्धार्थचा झाला होता. या प्रसंगातून कोंडाबाईंना आपली जीवन कहाणी आठवते.

कोंडाबाई तीन वर्षांच्या असताना त्यांचे वडील वारले. त्यानंतर त्यांच्या आईने दुसरे लग्न केले. नव्या वडिलांची आई त्यांना सावत्र समजायची. सर्व कामे करावी लागत, पण दोन-दोन दिवस खायला मिळत नसे. चौथ्या/ पाचव्या वर्षीच त्यांचा वनवास सुरू झाला. चौदाव्यावर्षी कोंडाबाईंचे लक्ष्मण पारधे यांच्याशी लग्न झाले. सासरीही गरिबीचे तीव्र चटके बसतच होते. महार, म्हणून गावगाड्याची कामे मोफत करावी लागत. मावशीच्या सांगण्यावरून, पारधे कुटुंबाने मुंबईला जाण्याचे ठरवले. मराठवाड्यातील जालना जिल्ह्यातील, खेड्यातील हे सर्व कुटुंब मुंबईला आले. मुंबईपर्यंतच्या प्रवासाचे आणि मुंबईतील सुरुवातीच्या काळातील दारिद्र्याचे चटके संपूर्ण कुटुंबाला बसत होते. भुकेमुळे छोट्या राजेंद्रने कोंडाबाईंच्या मांडीवर प्राण सोडले. शेवटी पारधे कुटुंब साहित्य सहवासात, कॉलनीत कामगार म्हणून आले. प्रचंड गरिबीमुळे निर्माण झालेले हे सर्व प्रसंग वाचताना वाचकाचे डोळे वारंवार भरून येतात.

साहित्य सहवासातील विविध इमारतींचे काम जसे पूर्ण झाले, तसे तेथे विविध साहित्यिक राहायला आले. त्यांच्याकडे धुण्याभांड्यांची कामे कोंडाबाई करीत. विविध साहित्यिकांच्या घरातील स्नेहशील वातावरणामुळे कोंडाबाईंची मुले, सिद्धार्थ आणि रमेश शाळेत आणि नंतर कॉलेजमध्ये शिकली. शिक्षणासाठी सर्व प्रकारची मदत आणि मार्गदर्शन तेथील कुटुंबांनी केले. कोंडाबाईंनी जवळच्या नातेवाईकांनाही बोलावून घेतले आणि तेही तेथेच ते काम करू लागले.

कोंडाबाईंनी विविध साहित्यिकांच्या घरातील परिस्थितीचे उत्तम निरीक्षण केले. ते या पुस्तकातील विविध प्रकरणांतून उत्तम प्रकारे वाचकांसमोर उलगडते. व.पु. काळे, विंदा करंदीकर, य.दि. फडके, सिन्हा यांच्याशी निगडित विविध आठवणी विलक्षण वाचनीय आणि रंजकही झाल्या आहेत.

१०, फुलराणी हा साहित्य सहवासमधील फ्लॅट कसा विकत घेतला, त्या मार्गात कोणत्या विविध अडचणी वेळोवेळी आल्या, याविषयीचे सिद्धार्थ यांनी आपले सविस्तर मनोगत ''आईस पत्र...'' मध्ये लिहून ''फुलराणी'' या सविस्तर प्रकरणात मांडले आहे. हे प्रकरण विलक्षण वाचनीय झाले आहे. त्यामधून कोंडाबाई यांच्या संपूर्ण कुटुंबाची विविध स्वभाववैशिष्ट्ये वाचकांसमोर उलगडतात.

काही वर्षांपूर्वी सिद्धार्थने लिहिलेल्या कॉलनी, या पुस्तकाविषयीचे कोंडाबाईंचे विचार वाचनीय झाले आहेत. कोंडाबाईंनी आपल्या मुलांप्रमाणेच, साहित्य सहवासमधील अन्य मुलांविषयीही सविस्तरपणे, प्रेमाने सांगितले आहे.

साठसत्तरच्या दशकात साहित्य सहवासात विविध साहित्यिक राहावयास आले. त्यांची यादी देण्यात आली आहे. साहित्य सहवासातील काहींनी भारतरत्न, ज्ञानपीठ इ. विशेष सन्मान प्राप्त केले. शेवटी, ''माझी शिदोरी''मध्ये साहित्य सहवासात राहणाऱ्या विविध स्त्रियांनी कोंडाबाईविषयी पत्ररूपाने लिहिले आहे. ही सर्व पत्रे विलक्षण हृद्य आणि वाचनीय आहेत. त्यामधून कोंडाबाईंच्या स्वभाववैशिष्ट्यांचे विविध पैलू उलगडतात. विविध रंगीत छायाचित्रांतून कोंडाबाईंचे जीवनदर्शन होते आहे. कोंडाबाई अविरत प्रयत्नांतून आणि अखंड कष्टांद्वारे आपले आणि आपल्या कुटुंबियांचे जीवन यशस्वी करतात. त्यामुळेच हे पुस्तक विलक्षण वाचनीय, प्रेरक आणि संग्राह्य झाले आहे.

**

पुस्तकाचे नाव : मु.पो.१०, फुलराणी कथन : कोंडाबाई लक्ष्मण पारधे शब्दांकन : सिद्धार्थ लक्ष्मण पारधे. मोबा. : ९६१९७७९८४२ प्रकाशक : मॅजेस्टिक पब्लिशिंग हाऊस गिरगाव, मुंबई- ४ पहिली आवृत्ती : एप्रिल २०२४ पृष्ठे : १६८. मूल्य : रु.२५०/-

---

# आठवणीतली गुलाबी थंडी..!

धनंजय शेटये



हवेत सुखद गारवा होता. मनात संगीत होतं.आजची रम्य प्रभात मनाला उभारी देणारी अगदी प्रसन्न वातावरणात मन मोहीत झाले होते.दाट धुक्याने आसमंत, रस्ते आच्छादले होते.झाडांच्या पानावरुन नितळ ओघळणाऱ्या दवबिंदूची सळसळ निरव शांततेचा भंग करीत होती.पणझाडांच्या पानावेलींवरुन हे ओघळणारे दवबिंदूच्या पाण्याच्या थेंबांचे संगीत त्या वातावरणात एक निसर्गाचे अलौकिक संगीत अनुभवण्याची मजा काही औरच होती.अंग गारठणारी कडाक्याची थंडी अंगाला झोंबत होती पण निसर्गरम्य वातावरणात मन त्या गुलाबी थंडीला अधीक आपुलकीने खुणावत होते.

कोकणच्या निसर्गरम्य वातावरणात हिवाळ्यात जो आनंद अनुभवता येतो तो इतर कुठल्याही ऋतूत अनुभवता येणार नाही.मंत्रमुग्ध करणारे प्रसन्न वातावरण आणि गुलाबी थंडीत मनमुरादपणे चालत निसर्गरम्य परिसरातला फेरफटका चहाच्या त्यानंतर खेड्यातल्या टपरीवरचा उफाळलेला गरमागरम चहा आणि कुरकुरीत कांदाभजी यांच्यावर ताव मारण्याचा आनंद काही वेगळाच असतो.

नव्वदीच्या दशकात आमच्या बालपणी सकाळ व दुपारी अशा दोन सत्रात शाळा असायची म्हणजे आम्हाला सकाळी आणि परत दुपारी सुद्धा शाळेत जावे लागायचे. भल्यापहाटे कडाक्याच्या थंडीत उठावे लागायचे.मागल्यादारी न्हनीजवळची चुल आई लवकरच पेटवून ठेवायची मग रणरणत्या चुलीवर आंघोळीसाठीच्या पाण्याचा भलामोठा काळवंडलेला हंडा ठेवलेला असायचा. पहाटे कडाक्याच्या थंडीपासून बचाव करण्यासाठी उठल्या उठल्या चुलीजवळ पाय पसरवून चुलीची उब घेत असू.कधी कधी भातशेतीच्या कोप-यात आदल्या दिवशी वाळलेला पालापाचोळा साठवून 'धग' पेटवत असू.मग सगळे शालेय मित्र शाळेत जाण्यापूर्वी त्या धगाजवळ उभे राहुन गुलाबी थंडीत हात पाय शेकवून घेत असू.दूरवरुन कुठुनतरी रेडिओवरचे कार्यक्रम कानावर पडत असत. शाळेत गेल्यावर शाळेच्या आवारातील साफसफाई करत असू. गवत काढून, पालापाचोळा गोळा करुन शाळेचा परिसर स्वच्छ करत असू.त्यानंतर कडाक्याच्या थंडीत शाळेच्या अंगणात प्रार्थना असायची.

'आजचे पंचाग' वाचणा-या मुलांचे हातपाय थंडीने लटपटत असायचे. मग कवायत असायची त्यावेळी कवायतीने थंडी मात्र दूर पळायची.खूप मज्जा यायची. शालेय जीवनात शनिवार खूप मजेशीर असायचा.शनिवारी अख्खी शाळा शेणाने सारवायची जबाबदारी त्या त्या वर्गातील विद्यार्थ्यांची असायची.प्रत्येक वर्गातील थोराड चारपाच मुलगे गावात शेण आणण्यासाठी वाडीतील गाई गुरांच्या गोठ्यात जात असत. ते काम करण्यासाठी सर्वचजण उत्सुक असायचे. त्यानिमित्ताने शाळेबाहेर फेरफटका मारायला मिळत असे. त्या कामात लाज किंवा कमीपणा कधीच वाटला नाही. मुली आपापला वर्ग शेणाने स्वच्छ सारवत असत. मुलगे बादलीने पाणी आणून द्यायचे. त्यामुळे शनिवार हा स्वच्छतेसाठीचा असायचा! थंडीमध्ये हात गारठलेले असायचे पण शेणात हात घालून अख्खा वर्ग सारवत असत. या गोष्टींमुळे आमच्या काळातल्या विद्यार्थ्यांना मौलिक शिक्षण मिळाले.पण ते दिवस आठवले तरी आज आनंदाने मन भरून येते. शाळेत शिपाई ही गोष्टच अस्तित्वात नव्हती.

शालेय बाग तर आम्हा मुलांच्या जीवावरच बहरायच्या. विहीरीचे रहाटाने पाणी काढून बादलीच्या कड्या पकडून दोन-दोन विद्यार्थी दहा ते वीस बादल्या पाणी प्रत्येक बागेला देत असू. 'माझी शाळा' हा जो आपलेपणा होता तो वेगळाच होता. मे महिन्यात सुट्टीमध्ये बाग ओसाड पडू नये म्हणून आम्ही खास बागेला पाणी द्यायला शाळेत जात असू. शालेय जीवनातील थंडीचा मौसम मजेशीर असायचा. हिवाळ्यातच आमचा शालेय वनभोजनाचा कार्यक्रम असायचा. थंडीमध्ये गडद घनदाट वनराईमध्ये आमचं वनभोजन असायचं. आमचे शिक्षक त्या वनराईत स्वच्छ नितळ खळखळणा-या झ-याच्या पाण्याचा वापर करून सार्वजनिक असे विद्यार्थ्यांसाठी जेवण बनवायचे. मिक्सर न वापरता केलेले जेवण चटकदार,चवदार असायचे. आमचे शिक्षक,शिक्षिका भोपळ्याची किंवा बटाट्याची भाजी,वरण आणि जीलेबी बनवायचे.त्यामुळे अशा गुरुजनांच्या सहवासात आयुष्याचा जडणघडणीचा पाया भक्कम झाला होता. त्या वनराईतला झोंबणारा गारवा आजही आठवतो. हे सर्व उपक्रम म्हणजे आमच्या जडणघडणीची महत्त्वाची अंगे होती.

शाळेतुन घरी आल्यावर गुरांना पाण्याला घेऊन ओढ्याकाठी जात असू. मग उन्हात उभे राहून थंडी पळवत असू आणि जास्त ऊन लागले की लगेच ओढ्यात जाऊन मनसोक्त डुंबत असू. परत अंग सुकायला बाहेर यायचो परत ओढ्यात उतरायचो असा दिनक्रम असायचा.दर रविवारी अगदी सकाळी सकाळी वाडीवाडीच्या संघामध्ये क्रिकेट सामने खेळायचो.थंडीने गारठलेल्या हातांनी झेल पकडताना हात सुन्न व्हायचे.

सायंकाळी सहा साडेसहा वाजता शेतातल्यात जावे लागायचे.तिथे लालाजी,मुळा यांना लाठीच्या कोळम्याने किंवा लाकडी सारिकाने पाणी द्यायचो.आज लाठीचे कोळमे,लाकडी सारिक दुरापास्त झाले आहे. आजच्या पिढीला हे औजारे माहीतही नसतील.भाज्यांचे वाफे, भरगच्च मिरच्यांनी लगडलेली रोपे, जमीनीवर पसरलेल्या कलिंगडांच्या वेलीवर लागलेली कलिंगडं पाहतानाचा तो अलौकिक आनंद परत मिळत नाही .तो मातीचा अनोखा गंध मोहीत करायचा.

**

---

# वेध-अलिबाग २०२५ रंग उमंग

प्रतिनिधी






अलिबाग परिसरातील नवयुवक नवीन वर्षाचे स्वागत वेगवेगळ्या क्षेत्रातील उत्तुंग व्यक्तिमत्त्वांच्या मुलाखतीच्या कार्यक्रमातून प्रेरणा घेऊन करणार आहेत. विद्यासान एज्युकेशनल फाऊंडेशन, अलिबाग आणि इन्स्टिट्यूट ऑफ सायकॉलॉजीकल हेल्थ, ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने येथील आरसीएफ वसाहतीमध्ये रविवार, दि. १९ जानेवारी २०२५ रोजी आयोजित वेध अलिबाग 'रंग-उमंग' या कार्यक्रमांतर्गत भूतपूर्व आयपीएस अधिकारी मीरा बोरवणकर, 'चला हवा येऊ द्या'चे पत्रलेखक अरविंद जगताप, मायक्रोसॉफ्टचे डायरेक्टर चिन्मय गवाणकर, एकल प्रवासी आभा चौबळ यांसह डिझाईन जत्रा या आगळ्या सामाजिक-स्थापत्य संस्थेच्या वास्तुविशारदांच्या मुलाखती विख्यात मानसोपचारतज्ज्ञ डॉ. आनंद नाडकर्णी घेणार आहेत. डॉ आनंद नाडकर्णी यांची इन्स्टिट्यूट ऑफ सायकॉलॉजीकल हेल्थ, ठाणेतर्फे महाराष्ट्रातील विविध शहरांत स्थानिक संस्थांच्या सहयोगाने वेध कार्यक्रमांतर्गत वेगवेगळ्या क्षेत्रातील उत्तुंग व्यक्तिमत्वांच्या मुलाखती घेतल्या जातात. विद्यासान एज्युकेशनल फाऊंडेशन, अलिबागच्या विद्यमाने गेल्या वर्षी प्रथमच वेध-अलिबागचे आयोजन करण्यात आले होते. गतवर्षी १४ जानेवारी रोजी आरसीएफ कम्युनिटी हॉलमध्ये झालेल्या वेध-घेऊ भरारी या वेधच्या कार्यक्रमात अंध व्यावसायिक सागर-नेत्रा पाटील, पर्यावरणस्नेही उद्योजिका अमिता देशपांडे, इंफ्लयूएन्सर रानमाणूस प्रसाद गावडे, लेकमॅन आनंद मल्लिगवड आणि ऑस्कर नामांकित आर्ट डायरेक्टर दिलीप मोरे यांच्या मुलाखती डॉ. आनंद नाडकर्णी यांनी घेतल्या होत्या. वेध-अलिबाग २०२५ ची थिम आहे ''रंग-उमंग''. विविध क्षेत्रातील आगळ्यावेगळ्या व्यक्तिमत्त्वांच्या जीवनप्रवासाचे रंग उलगडत असताना त्या व्यक्तींच्या यशस्वीतेमागची ऊर्जा, उत्साहाचे (उमंग) स्रोत डॉ. नाडकर्णी यांच्या माध्यमातून जाणून घेण्यासाठी अलिबाग परिसरातील नवयुवक वेध-अलिबाग २०२५ रंग-उमंग कार्यक्रमात पुन्हा एकदा सहभागी होण्यासाठी निश्चितच उत्सुक असतील. या कार्यक्रमदरम्यान डॉ. आनंद नाडकर्णी ज्यांची मुलाखत घेणार आहेत, त्यांचा थोडक्यात परिचय.

**मीरा बोरवणकर :** भूतपूर्व आयपीएस अधिकारी मिरा चड्ढा बोरवणकर मूळच्या पंजाबच्या. भारताच्या राष्ट्रीय पोलीस अकादमीमधून पदवी प्राप्त करणाऱ्या त्या १९८१ च्या बॅचमधील एकमेव महिला. त्यांचं शालेय शिक्षण फाजिल्कामध्ये झालं. जालंधर डीएव्ही महाविद्यालयामधून इंग्रजी साहित्यातून पदव्युत्तर पदवी प्राप्त केली. पुणे विद्यापीठामधून कायद्याचे शिक्षण घेतले आणि संस्थापक व्यवस्थापनामध्ये पीएचडी पूर्ण केली. त्या अमेरिकेच्या मिनेसोटा ह्युबर्ट एच हम्फ्री शिष्यवृत्तीच्या मानकरी आहेत. संस्थापक बांधणी गुन्हेगारी तपास कायदा आणि प्रशासन यामध्ये विशेष अभ्यास आहे. त्या मुंबई गुन्हे शाखेच्या सहआयुक्त, पुण्याच्या पोलीस आयुक्त, तसेच महाराष्ट्र तुरुंग विभागाच्या प्रमुख होत्या, त्यांना वैशिष्ट्यपूर्ण आणि गुणवत्तापूर्ण सेवेसाठी भारताच्या राष्ट्रपतीच्या पोलीस पदकाने सन्मानित करण्यात आले होते. तसेच त्यांना मिनेसोटा विद्यापीठकडून अतुलनीय नेतृत्व पुरस्काराबरोबर अनेक पुरस्कार प्राप्त झाले आहेत.

**चिन्मय गवाणकर :** जागतिक तंत्रज्ञान क्षेत्रातील प्रमुख कम्पनी मायक्रोसॉफ्ट कॉर्पोरेशनचे कंट्री डायरेक्टर. व्हीजेटीआयचे अभियांत्रिकी पदवीधर असलेले चिन्मय गवाणकर यांनी मायक्रोसॉफ्ट, गुगल, आयबीएम, टाटा अशा नामांकित आस्थापनांमध्ये डेटा अनॅलिटिक्स आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्स क्षेत्रात नेतृत्वाची जबाबदारी यशस्वीपणे पार पडली आहे. या विषयांवर मोठ्या उद्योगांना तसेच देशभरातील उदयोन्मुख व्यवसायांना सल्ला देण्याचा २३ वर्षांहून अधिक वैविध्यपूर्ण अनुभव आहे. करिअर आणि आर्टिफिशियल इंटेलिजेंस या विषयावरची त्यांची पोडकास्ट आणि जाहीर व्याख्याने बहुचर्चित आहेत.

**आभा चौबळ :-** वर्क अवे या पद्धतीने जगभर एकल भटकंती करणाऱ्या आभा चौबळ यांनी ग्रीस, जर्मनी, बोस्निया, स्पेन, फ्रांस, युके अशा कित्येक देशांत काम करून प्रवासाचा हा विलक्षण अनुभव घेतला आहे. फोटोग्राफीमध्ये स्वत:च्या नावाचा एक व्यावसायिक ब्रँड बनविलेल्या आभाने भारतभरातील वेगवेगळ्या संस्कृतीचे विवाहविधी कॅमेराबद्ध केले आहेत. जर्मन भाषेत जिद्दीने प्रावीण्य प्राप्त करून सवडीनुसार जर्मन शिकविण्याचे कामही ती करत असते. मात्र, व्यावसायिक काम आणि सोलो ट्रॅवलिंग हा छंद यातलं संतुलन ती कसोशीने आणि निग्रहपूर्वक पाळते. सोलो ट्रॅवलिंग करताना युरोपातल्या कुठल्यातरी दूरवरच्या खेड्यात घेतलेले विलक्षण अनुभवांविषयी आभा आपल्याशी बोलत असते, तेव्हा तिच्या त्या गप्पांमध्ये आपणही समृद्ध होत जातो.

**अरविंद जगताप :** झी मराठी वाहिनीवरील सुप्रसिद्ध विनोदी कार्यक्रम ''चला हवा येऊ द्या'मधील पोस्टमन काकांच्या हृदयस्पर्शी पत्रांच्या माध्यमातून महाराष्ट्रातील प्रत्येक घराघरात ते पोहोचलेले अरविंद जगताप हे प्रतिथयश कवी, गीतकार आणि पटकथा लेखक आहेत. ''पत्रास कारण की'', ''गोष्ट छोटी डोंगराएवढी'' व ''सेल्फी'' ही विशेषतः तरुणांमध्ये त्यांची काही गाजलेली पुस्तकं. ''डॅम्बीस'', ''गल्लीत गोंधळ दिल्लीत मुजरा'', ''गोष्ट छोटी डोंगरा एवढी'' अशा अनेक मराठी चित्रपटांचे लेखन त्यांनी केले आहेत. ''कोणता झेंडा घेऊ हाती'', ''पत्रास कारण की'', ''देव चोरला'' यांसह अनेक सुप्रसिद्ध चित्रपट गीतांचे ते गीतकार आहेत.

**डिझाईन जत्रा :-** डिझाईन जत्रा ही एक सामाजिक-स्थापत्य संस्था आहे. वास्तुविशारद विनिता कौर एम. चिरागिया, वास्तुविशारद प्रतीक धनमेर आणि वास्तुविशारद शार्दुल पाटील यांची डिझाईन जत्रा पारंपरिक वास्तुकलेपासून प्रेरणा घेऊन आजच्या गरजांनुसार वास्तूंचे डिझाईन्स करतात. स्थानिक समुदायांचा सहभागाचा आणि स्थानिक संदर्भांना अधिक प्रतिसाद देणाऱ्या नैसर्गिक गोष्टींचा वापर बांधकामात करून ही मंडळी स्थापत्य कलेचा आगळा आविष्कार साकारतात. शहरी-ग्रामीण संवाद सुलभ करणे आणि नैसर्गिक वास्तुकलेद्वारे लोकांना मदत करणे हे देखील त्यांचे एक उद्दिष्ट आहे. वेध-अलिबागच्या निमित्ताने एक नवे वैचारिक दालन अलिबाग मधील तरुण पिढीसाठी खुले होत आहे.

या कार्यक्रमाच्या आयोजनात मुख्य प्रायोजक म्हणून आरसीएफ लिमिटेडचे सर्वतोपरी सहाय्य लाभले आहे. आयुष्यची दिशा ठरविण्यासाठी प्रेरणा देणाऱ्या, मार्गदर्शन करणाऱ्या या उपक्रमात जास्तीत जास्त संख्येने सामील होऊन याचा लाभ घ्यावा असे आवाहन विद्यासान एज्युकेशनल फाऊंडेशन, अलिबागतर्फे करण्यात येत आहे. कार्यक्रमातील सहभागासाठी : ८६९८७९५७९६ (उमेश वाळंज) किंवा ९८५०९६५४५२ (अनिल आगाशे) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

**

निवडक

## हरियाणाचा शानदार विजय

**नवी दिल्ली :** पिछाडीवर असतानाही कोणतेही दडपण न घेता उत्कृष्ट अष्टपैलू खेळ करीत हरियाणा स्टीलर्स संघाने पाटणा पायरेट्स संघाला ४२-३६ असे हरविले आहे. प्रो कबड्डी लीग या सामन्यात मध्यंतराला पाटणाकडे १७-१६ अशी केवळ एक गुणाची नाममात्र आघाडी होती. या स्पर्धेत हरियाणाने १६ सामन्यांत १३वा विजय नोंदवला आहे. यामध्ये हरियाणाच्या शिवम पटारे याने ११, मोहम्मद रेझा शादलूइने ९ आणि संजय याने ५ गुण मिळवून संघाच्या विजयात मोलाचा वाटा उचलला आहे. तर, पाटणा संघाकडून देवांकने १३ गुण मिळवले.

## वजनी गटात फेरबदल

**नवी दिल्ली :** आंतरराष्ट्रीय वेटलिफ्टिंग महासंघाने पुढील वर्षीच्या जून महिन्यापासून पुरुष आणि महिला वेटलिफ्टिंग स्पर्धांमधील वजनी गट कमी केले आहेत. आता दहाऐवजी आठ वजनी गटच असतील. पुरुष गटात ५५ किलो गट रद्द करण्यात आला आहे, त्यामुळे आता ६० किलो गटापासून सुरुवात होईल. त्यामुळे ७०, ८० आणि ९० किलो या गटातही बदल करण्यात आले आहेत. नव्या प्रस्तावानुसार ६०, ६५, ७१, ७९, ८८, ९८ आणि ११० असे वजनी गट असतील.

## इंग्लंडचा भीमपराक्रम

**लंडन :** इंग्लंडने दुसऱ्या कसोटीत विजयाच्या दिशेने वाटचाल केली आहे. त्यांनी न्यूझीलंडविरूद्धच्या दुसऱ्या कसोटीत ५३३ धावांची मजबूत आघाडी घेतली आहे. पहिल्या कसोटीत यजमानांना आठ गडी राखून पराभूत केल्यानंतर इंग्लंडने आघाडी घेतली आहे. दरम्यान, इंग्लंडने या कसोटीत धमाकेदार फलंदाजी करत इतिहास रचला आहे. बेन स्टोक्सच्या नेतृत्वाखालील संघ कसोटी क्रिकेटमध्ये ५ लाख धावा करणारा जगातील पहिला संघ बनला आहे. इंग्लंडने १०८२ कसोटी खेळल्या असून ५ लाखांपेक्षा जास्त धावा केल्या आहेत.

## अन्वर शेख यांचे निधन

**पुणे :** महाराष्ट्र क्रिकेट संघातील माजी क्रिकेटपटू अन्वर शेख यांचे पुणे येथे निधन झाले आहे. नाशिक येथे क्रिकेट खेळायला सुरुवात करतांना, त्यांनी पुढे आपल्या उत्कृष्ट खेळाच्या जोरावर महाराष्ट्राच्या रणजी संघात स्थान मिळविले होते. जलदगती गोलंदाजाच्या भूमिकेतून त्यांनी संघासाठी अनेक सामन्यांमध्ये भरीव योगदान दिले होते. रणजी सामन्यात महाराष्ट्र संघाकडून खेळताना १०० बळी घेणारा पहिला नाशिककर खेळाडू होण्याचा बहुमान अन्वर शेख यांनी पटकावला होता.

## गतविजेतीवर 'अनमोल' विजय

गुवाहाटी : भारताची उदयोन्मुख बॅडमिंटन खेळाडू अनमोल खारब हिने गतविजेत्या थायलंडच्या लालिनरात चैवान हिचा पराभव करून गुवाहाटी मास्टर्स सुपर १०० श्रेणी बॅडमिंटन स्पर्धेत उपांत्य फेरी गाठली आहे. तिने २१-१२, २२-२४, २२-२० असा पराभव केला आहे. हा सामना १ तास १४ मिनिटे रंगला होता. ही लढत तिने दुसऱ्या डावातच जिंकली असती; परंतु दुसऱ्या डावात अनमोल ११-१६ अशी पिछाडीवर होती, त्यावरून तिने १६-२० अशी लढत दिली होती. अखेर २२-२४ अशा फरकाने हा डाव गमवावा लागला.





# महाविद्यालयीन राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा

## ■ डॉ. आंबेडकर महाविद्यालयाचे जेतेपद ; महर्षी दयानंदची 'अ' संघावर मात

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

**आंतर महाविद्यालयीन राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा तथा कै. एमएन वर्मा व कै. सुमती अंकूश मालकर फिरता चषक स्पर्धेसाठी झालेल्या अंतिम सामन्यात मुलांमध्ये डॉ. आंबेडकर महाविद्यालयाने व मुलींमध्ये महर्षी दयानंद महाविद्यालय 'ब' मिळवले आहे.**

मुलांच्या अंतिम सामन्यात डॉ. आंबेडकर महाविद्यालयाने एसएसटी महाविद्यालयाचा २४-२० असा ४ गुणाने पराभव करत स्पर्धेचे विजेतेपद पटकावले आहे. या सामन्यात आंबेडकरच्या आकाश साळवी, जितेंद्र यादव यांनी चढाईत चमकदार कामगिरी केली व सनी भगतने उत्कृष्ट पकड करत संघाला विजेतेपद मिळवून दिले आहे. तर, पराभूत एसएसटीच्या चीन्मय गुरख, रोहन कनोजीया यांनी चढाईत व सिद्धेश पांचाळने छान पकड करत आपल्या संघाला विजय मिळवून देण्यासाठी जोरदार संघर्ष केला होता. मात्र, ते यशस्वी होऊ शकले नाहीत.

मुलींच्या अंतिम सामन्यात महर्षी दयानंद महाविद्यालयाच्या 'ब' संघाने त्यांच्याच 'अ' संघाचा २८-२६ असा दोन गुणांनी पराभव करत विजेतेपदावर नाव कोरले आहे. या सामन्यात महर्षी दयानंदच्या रिया मडकईकर, नेहा गुप्ता यांनी सामन्यात जोरदार कामगिरी करत विजय खेचून आणला तर उपविजेत्या महर्षी दयानंद 'अ' संघाच्या रितीका फूलसुर्गे, अदिती शिंदे, उर्जा साळगावकर यांनी दिलेली लढत पराभवापासून वाचवू शकली नाही.

या स्पर्धेचा बक्षीस समारंभ संजय निकम, सचिन कदम, माया आक्रे, डॉ. हेमंत शर्मा, जीवन पैलकर, मनोज पाटील, प्रताप परब, बाळ तोरसकर, डॉ. प्रताप कामठेकर, बी. टी. निकम, मेजर अशोक कुवर, पंडित पाटील, प्रकाश भामरे, रमेश लांबे, वैशाली पाटील, राजेश पाडावे, डॉ. यू. सी. शुक्ला, ॲड. एम. कुराडे, गणेश गव्हाणे आदी मान्यवरांच्या हस्ते पार पडला.

दरम्यान, मुंबईतील महर्षी दयानंद महाविद्यालयातर्फे ४२ वी आंतर महाविद्यालयीन खो-खो स्पर्धा लालबाग येथील मनोरंजन मैदानावर पार पडली. या स्पर्धेत मुलांचे विजेतेपद झुनझुनवाला महाविद्यालयाने तर मुलींचे विजेतेपद एस.एस.टी. महाविद्यालयाने मिळवले आहे. या बक्षीस समारंभाचे सूत्रसंचलन एन. माने यांनी केले.

# कर्जतमध्ये क्रीडा महोत्सवाला सुरुवात

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाच्यावतीने कर्जत तालुक्यातील सर्व जिल्हा परिषद शाळांमध्ये कला आणि क्रीडा महितोत्सवाला सुरुवात झाली आहे. मालेगाव दहिवली केंद्रामध्ये तब्बल २३५ विद्यार्थ्यांनी विविध क्रीडा आणि कला प्रकारात सहभाग घेतला होता.

रायगड जिल्हा परिषद शिक्षण विभाग यांच्या माध्यमातून तालुका स्तरीय क्रीडा आणि सांस्कृतिक तसेच व्यक्तिमत्व विकास स्पर्धांना सुरुवात झाली आहे. तालुका कला आणि क्रीडा महोत्सव प्रथम केंद्र पातळीवर आणि यानंतर तालुका पातळीवर होणार आहे. यात सांस्कृतिक प्रकारात समूह गीत गायन, परंपरिक नृत्य, पथनाट्य तर क्रीडा विभागात लगोरी, लंगडी, शिल्प बनविणे, बेचकीने नेम धरणे, दोरी उडी असे ग्रामीण भागातील सध्या लोप पावलेले खेळ यांचा समावेश करण्यात आला आहे. कर्जत तालुका पंचायत समितीचे गट शिक्षणाधिकारी संतोष दौंड यांच्या नियोजनाखाली कला आणि क्रीडा महोत्सव सुरु असून त्यात तालुक्यातील दहिवली मालेगाव केंद्र मधील दहिवली, मालेगाव, बिरदोळे, कोदिवले, वंजारपाडा, झेंडेवाडी, मानिवली, निकोप, वरई, अवसरे या शाळांच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.



## वाडगाव येथे प्रशिक्षण शिबीर

**रेवदंडा :** अलिबाग तालुक्यातील वाडगाव येथील जिल्हा कुस्ती प्रशिक्षण केंद्रात रविवारी (दि.८) सकाळी १० वाजता कुस्ती पंच व प्रशिक्षक प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. रायगड जिल्ह्यातील होतकरू कुस्ती पंच व प्रशिक्षक यांच्या प्रशिक्षणासाठी हे शिबीर जिल्हा व तालुका कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष जयेंद्र भगत यांच्यावतीने आयोजीत करण्यात आले आहे. जिल्हातील कुस्ती पंच व प्रशिक्षक यांनी शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन जयेंद्र भगत यांनी केले.

## उरणच्या मैत्रैयची 'सुवर्ण' कमाई

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

जळगाव येथे नुकत्याच पार पडलेल्या महाराष्ट्र राज्यस्तरीय पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत जसखार-उरण येथील मैत्रेय गणेश मोकल याने सुवर्णपदकाची कमाई केली होती. तसेच, छत्तीसगड येथे १६ जानेवारी रोजी होणाऱ्या राष्ट्रीय पॉवरलिफ्टिंग अजिंक्यपद स्पर्धेसाठी मैत्रेयची निवड करण्यात आली आहे.



नुकतीच जळगाव येथे महाराष्ट्र राज्यस्तरीय पॉवरलिफ्टिंग स्पर्धा पार पडली. या स्पर्धेत शंभरहून अधिक स्पर्धक सहभागी झाले होते. या स्पर्धेत ९३ वजनी गटात उरण-जसखार येथील मैत्रेय राजेश्री गणेश मोकल यांने ६६० किलो वजन उचलून सुवर्णपदक पटकावले होते. या कामगिरीची दखल घेऊन मैत्रैय याची छत्तीसगड येथे होणाऱ्या राष्ट्रीय पॉवरलिफ्टिंग अजिंक्यपद स्पर्धेसाठी निवड झाली आहे.


## भारताची अंतिम सामन्यात धडक

**दुबई :** भारताच्या १९ वर्षांखालील संघाने आशिया चषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात धडक दिली आहे. भारताने उपांत्य फेरीत श्रीलंकेवर दणदणीत विजय मिळवला आहे. या विजयात वैभव सुर्यवंशी चमकला असून त्याने सलग दुसऱ्या सामन्यात अर्धशतक झळकावले आहे. त्याला मुंबईच्या आयुष म्हात्रेने दमदार साथ दिली. भारतासमोर अंतिम सामन्यात बांगलादेशचे आव्हान असणार आहे. दरम्यान, १३ वर्षीय वैभवने आक्रमक फटकेबाजी करताना ३६ चेंडूंत ६ चौकार व ५ षटकारांसह ६७ धावांची खेळी केली.

## हॉलीबॉल चाचणी स्पर्धेचे आयोजन

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

ठाणे जिल्हा डायरेक्ट व्हॉलीबॉल असो. आणि शिवभक्त क्रीडा मंडळ वडवली बदलापूर यांच्या माध्यमातून राज्य आणि राष्ट्रीय हॉलिबॉल निवड चाचणी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धांचे यजमानपद ठाणे जिल्हा डायरेक्ट व्हॉलीबॉल असो.ने स्विकारले आहे. उपरोक्त स्पर्धेचे आयोजन शिक्षक मतदार संघाचे आ. ज्ञानेश्वर म्हात्रे यांच्या पुढाकाराने होत आहे. तसेच, ७ आणि ८ डिसेंबर रोजी बदलापूर येथे या स्पर्धा होणार असून केशवदादा म्हात्रे स्मृती करंडक असे या स्पर्धेचे नाव ठेवण्यात आले आहे.



राष्ट्रीय आणि राज्य निवड चाचणीसाठी महाराष्ट्रातील डायरेक्ट व्हॉलीबॉलचे नामवंत खेळाडूंचा खेळ पाहण्याची संधी ठाणे जिल्ह्यातील क्रीडा रसिकांना मिळणार आहे. महाराष्ट्र अध्यक्ष डी. बी. साळुंके यांनी दिलेल्या माहितीनुसार राज्यातील सर्व जिल्ह्यातील संघ सहभागी होणार आहेत. ७ डिसेंबर पासून बदलापूर येथे होणाऱ्या स्पर्धेसाठी महाराष्ट्राचे संघ निरपेक्षपणे निवडले जातील आणि त्यातून राष्ट्रीय स्पर्धेसाठी संघांची निवड केली जाणार असल्याचे देखील त्यांनी सांगितले आहे.

# जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी

## ■ संमित्रची दुसऱ्या फेरीसाठी आगेकूच

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

मुंबई उपनगरने संयोजन संस्था चारकोप यांच्या सहकार्याने संचालिका नम्रता भोसले यांच्या सौजन्याने कांदिवलीतील दादोजी कोंडदेव क्रीडांगणावर मुंबई उपनगर जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत द्वितीय श्रेणीतून प्रथम श्रेणीत बढती मिळालेल्या संमित्रने संकल्प प्रतिष्ठानला २७-१५ असे रोखत दुसरी फेरी गाठली आहे. विश्रांतीला १६-०६ अशी आघाडी घेणाऱ्या संमित्रने नंतर संयमाने खेळ करीत सर्वांना आश्चर्याचा धक्का दिला. तसेच, याच गटात नवरत्न 'अ' संघाने टागोर नगर 'ब' संघाचा २५-१० असा सहज पाडाव केला. तर, सत्यम सेवाने तरुण मंडळ उचाटचा २९-०८ असा पराभव केला.

कुमार गटात जय लहूजी मंडळाने शिवराय प्रतिष्ठानचा कडवा प्रतिकार १७-१६ असा मोडून काढत तिसरी फेरी गाठली आहे. मध्यांतराला ६-५ अशी आघाडी घेणाऱ्या लाहुजीने शेवटी याच एका गुणाच्या फरकाने सामना जिंकला. याच गटात सह्याद्री मित्र 'ब'ने हीड इंडिया 'ब'ला २६-२५ असे चकवित आगेकूच केली आहे. पूर्वार्धात २०-१४ अशी आघाडी घेणाऱ्या सह्याद्रीला उत्तरार्धात विजया करीता हिड इंडियाने चांगलेच झुंजविले होते. कुमारी गटात श्री साई मंडळाने तारा स्पोर्टस्‌ला चुरशीच्या लढतीत ३०-२९ असे चकवित तिसरी फेरी गाठली. पहिल्या डावात १४-१६ अशा दोन गुणांनी पिछाडीवर पडलेल्या श्री साईने दुसऱ्या डावात आपला खेळ उंचावत हा निसटता विजय मिळविला आहे.



## कराटे स्पर्धेत रायगडचा दबदबा

**। रसायनी । वार्ताहर ।**

गोव्यातील म्हापसा येथे झालेल्या २५व्या फुनाकोशी जागतीक कराटे अजिंक्यपद स्पर्धेत खालापूरच्या डॉ. देव इंटरनॅशनल मार्शल आर्टस् अकॅडमीच्या खेळाडूंनी ६ सुवर्ण, ४ रौप्य, ६ कांस्यपदकाची कमाई केली आहे. यात सिया बैलमारे १ सुवर्ण व २ कांस्यपदके, साक्षी धारणे १ सुवर्ण व १ रौप्यपदक, अस्मिकुमार जैस्वाल १ सुवर्ण व १ रौप्यपदक, गार्गी राऊत १ सुवर्ण व १ रौप्य पदक, गणेश तोरस्कर १ सुवर्ण व १ रौप्यपदक, अर्णव जाधव १ सुवर्ण व १ कांस्यपदक, दित्या पाटील २ कांस्यपदके, कौशल बांदेकर याने १ कांस्यपदक पटकावले आहे. खेळाडूंना सेन्सई नागेश बांदेकर, नितीन बोन्दार्डे या प्रशिक्षकांनी मार्गदर्शन केले.






रायगड जिल्हा चाचणी क्रिकेट स्पर्धा

# सागर कांबळे अकॅडमी विजयी

**। रायगड। क्रीडा प्रतिनिधी।**

**रायगड जिल्हा क्रिकेट असो.च्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या १६ वर्षाखालील मुलांच्या निवड चाचणी क्रिकेट स्पर्धेत पनवेलच्या सागर कांबळे क्रिकेट अकॅडमी संघाने एसबीसी महाड संघावर ८ गडी राखून विजय मिळवला आहे.**



पेण येथील छ. शिवाजी महाराज क्रीडांगणावर गुरवारी (दि.५) स्पर्धेचा अंतिम सामना सागर कांबळे क्रिकेट अकॅडमी पनवेल विरूद्ध एसबीसी महाड संघा मध्ये खेळवला गेला. यावेळी पनवेल संघाने नाणेफेक जिंकून प्रथम महाडच्या संघाला फलंदाजी करण्याचे आमंत्रण दिले. महाड संघाने ३४ षटकांमध्ये सर्व गडी गमावत ११२ धावसंख्या उभारली होती. मधल्या फळीत प्रथमेश मोरे ३३ व जुनेद खान यांनी २० धावा काढल्या. पनवेल संघाच्या प्रतीक बोटे याच्या भेदक गोलंदाजीने महाडचा अर्धा संघ तंबूत धाडला. त्याने ५ गडी बाद केले तर हिमांक धोका ३, रुद्र खोपकर याने २ फलंदाज बाद केले. प्रतिउत्तर देताना सागर कांबळे अकॅडमी संघांने २४व्या षटकात २ गडी गमावत ११२ धावांचे लक्ष्य पूर्ण केले. ओम साळुंके ५१ व तेजस गिलबिले यांनी नादबाद २९ धावा काढून संघाला विजय मिळवून दिला. महाडच्या संघाकडून आमन पठाण व वत्सल मोरे यांनी प्रत्येकी १ गडी बाद केला.

संपुर्ण स्पर्धेत एकूण २८ संघांनी सहभाग घेतला होता. प्रथम साखळी व नंतर बाद फेरीनुसार स्पर्धेत ४८ एकदिवसीय सामने यशस्वी रित्या पार पडले. अंतिम सामन्यासाठी प्रमूख अतिथी म्हणून आरडीसीएचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील, खजिनदार प्रशांत ओक, सहसचिव जयंत नाईक, सदस्य ॲड. पंकज पंडित, प्रदिप खलाटे, सामना अधिकारी सुरेश म्हात्रे, एजाज मारूफ, सागर मुळे, आदेश नाईक, विघ्नहर्ता मुंढे, शेखर भगत, सागर कांबळे, विकास पवार, रोहित कार्लेकर, आवेश चिचकर यांच्यासह दोन्ही संघाचे खेळाडू उपस्थित होते.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
**■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)